cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१२५ | सोमवार दि.२६ ऑगस्ट २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### काश्मीर निवडणूकीत काँग्रेसची सावधानता

जम्मू–काश्मीरमध्ये पुढच्या महिन्यात विधानसभेची निवडणूक होत आहे. पुन्हा एकदा हे राज्य राजकारणाकडे परतत आहे ही चांगली गोष्ट. वास्तविक लोकसभा निवडणुकीतही राज्यात चांगला उत्साह दिसून आला होता. मात्र, लोकसभेतील विजयी उमेदवार दिल्लीला जातात. विधानसभेची निवडणूक जिंकणारे आपल्या राज्याचे कारभारी असतात. त्यामुळे बऱ्याच काळानंतर आता विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने जम्मू–काश्मीरमध्ये रंगत निर्माण होणार आहे.

### आरबीआयने वाढविली सोन्याची किंमत

नवी दिल्लीः भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) मोठ्या प्रमाणावर सोने खरेदी केल्याने गेल्या वर्षभरात जागतिक बाजारातील सोन्याचे भाव तब्बल १८ टक्क्यांनी वाढले. त्यामुळे देशांतर्गत बाजारपेठेतील सोन्याच्या भावात दहा टक्क्यांनी वाढ झाल्याचे वर्ल्ड गोल्ड कौन्सिलने म्हटले आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणामुळे निर्माण झालेले राजकीय धोके, पतधोरणाबाबत वाढलेल्या अपेक्षा, अशा विविध कारणांसाठी आरबीआयने गेल्या वर्षभरात मोठ्या प्रमाणावर सोने खरेदी केले. आयात शुल्कात कपात केल्याने सोन्याच्या मागणीत वाढ झाली. त्यात सण, उत्सव आणि लग्नसमारंभात सोने खरेदी परंपरा भारतात आहे.

# त्रिदेव सरकारला घरी बसण्याची वेळ येईल

## मका, सोयाबीनच्या भावावरून राजू शेट्टी यांचा सरकारला इशारा

**सोलापूर । वृतसंस्था**

**स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते माजी खासदार राजू शेट्टी यांनी पुन्हा एकदा राज्य सरकारवर निशाना साधत टीका केली आहे. यावेळी शेट्टी यांनी शेतकऱ्यांच्या सोयाबीन आणि मक्याच्या भावावरून महायुतीसह मोदी सरकारवर निशाना साधला. जसे लोकसभा निवडणुकीवेळी कांद्यांच्या प्रश्नावरून शेतकऱ्यांनी सरकारला वठणीवर आणले. तसेचं विधानसभेची निवडणुक सोयाबीन आणि मक्यावरून होईल, असा इशारा शेट्टी यांनी**



**समाजमाध्यमातून पोस्ट करत दिला आहे.**

शेट्टी यांनी आपण मागच्या एक महिन्याभरापासून शेतकरी आंदोलनानिमित्त संपूर्ण महाराष्ट्रासह मध्यप्रदेशमधील काही भागांचा दौरा केल्याचे म्हटले आहे. तर सोयाबीन व मका पिकाचे यंदा चांगले उत्पादन आले असून शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. परंतु केंद्र सरकारने पामतेल व मका आयात करायचा निर्णय घेतल्यामुळे सोयाबीन व मक्याचे दर कमी होत असल्याचा दावा शेट्टी यांनी केली आहे. केंद्राच्या आडमुठ्या धोरणाचा सोयाबीन व मका उत्पादक शेतकऱ्यांना फटका बसणार असून तातडीने केंद्र सरकारने याबाबत उपाययोजना करावी असा इशारा शेट्टी यांनी दिला आहे. तसेच केंद्र सरकारने आपल्या धोरणात बदल न केल्यास शेतकऱ्यांचे सोनं असलेल्या सोयाबीनचा भाव २ हजार ५०० ते ३ हजार रूपये होईल. ज्यामुळे सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांची माती होईल अशी शक्यता शेट्टी यांनी व्यक्त केली आहे. शेट्टी यांनी यावेळी केंद्रासह राज्य सरकारला लोकसभा निवडणुकितील कमी झालेल्या जागांची आठवण करून देताना, कांद्यामुळे लोकसभा निवडणुकीत मोदी सरकारला शेतकऱ्यांनी वठणीवर आणले. आता सोयाबीन आणि मक्याचा भाव पडल्यास आगामी विधानसभा निवडणुकीत त्रिदेव असलेल्या सरकारला घरी बसण्याची वेळ येईल, असा इशारा शेट्टी यांनी राज्य सरकारसह केंद्र सरकारला दिला आहे.



### निधी नसेल तर आमदरांचे एक महिन्याचे वेतन थांबवा

याआधी देखील शेट्टी यांनी कृषी विभागाकडून देण्यात येणाऱ्या शेतकऱ्यांच्या विविध पुरस्कारावरून राज्य सरकारवर निशाना साधला होता. तसेच सरकारकडे जर शेतकऱ्यांना पुरस्कार देण्यासाठी निधी नसेल तर आमदारांचे एका महिन्याचे वेतन थांबवा असे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते माजी खासदार राजू शेट्टी यांनी म्हटले होते.

# सरकारचा पेन्शनवरून युटर्न

## मल्लिकार्जून खर्गे यांची टीका

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

केंद्र सरकारने शनिवारी सरकारी कर्मचाऱ्यांसाठी नवी युपीएस अर्थात युनिफाईड पेन्शन योजना जाहिर केली. या योजनेवरून काँग्रेसने टीकेची झोड उठविली आहे. युपीएस मधील यु म्हणजे मोदी सरकारचा युटर्न असल्याची टीका काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांनी केली.

मल्लिकार्जून खर्गे म्हणाले की, पंतप्रधानांच्या अहंकारावर जनतेच्या शक्तीने विजय



मिळवला. त्यामुळेच इंडिया आघाडीने जाहिर केलेल्या योजना मोदींचे सरकार वापरत आहे. ''यूपीएस मधील 'यू' म्हणजे मोदी सरकारचे यू टर्न असल्याची टीकाही यावेळी केली.नरेंद्र

◀◀ पान २ वर

# अजित दादांच्या दोन आमदारांचे टेन्शन वाढले

## महायुतीतील दोन ओबीसी नेते बंडाच्या तयारीत

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील राजकारण लोकसभेपासून पुर्णतः ढवळून निघाले आहे. राजकारणाला जातीचा रंग आल्याने आता लोकसभेनंतर विधानसभेत एकमेकांची जिरवाजिरवी करण्यासाठी मराठा समाजासह ओबीसी समाजानेही दंड थोपटले आहेत. अजित दादांच्या दोन आमदारांचे टेन्शन वाढणार असून महायुतीतील दोन ओबीसी नेत्यांनी बंडाची तयारी सुरु केली असून माजलगाव आणि आष्टी मतदार संघात तिरंगी लढत**



**पहायला मिळण्याची शक्यता आहे.**

आष्टी विधानसभा मतदार संघात सध्या चार संभाव्य उमेदवारांकडून जोरदार तयारी केली जात आहे. माजी मंत्री सुरेश धस हे मतदार संघात पायाला भिंगरी बांधल्यागत फिरत असून नागरीकांच्या समस्या सोडवण्याचा त्यांनी सपाटा लावला आहे. आपण कोणत्याच बाजूने मागे नसल्याचे संकेत त्यांनी आपल्या कामातून दिले आहेत. तर विद्यमान आमदार बाळासाहेब आजबे हे अजित पवार गटाचे असून आपल्यालाच उमेदवारी मिळणार असल्याचे सांगत त्यांनी सुध्दा दौरे सुरु केले आहेत. या दोन नेत्यांच्या तुलनेत ओबीसी नेते माजी आ. भीमराव धोंडे हे सुध्द मागे राहीले नाहीत. त्यांनीही मतदार संघात आपला जनसंपर्क वाढवला आहे. याशिवाय शरद पवार गटाचे नेते राम खाडे यांनी सुध्दा पवारांकडे उमेदवारी मागितली असून त्यांनीही तयारी सुरु केली आहे.

भीमराव धोंडे यांनी येणारी विधानसभा निवडणुक प्रतिष्ठेची केली असून २०१९ च्या निवडणुकीत

◀◀ पान २ वर

### धोंडे, निर्मळ पावरफुल्ल

आष्टीत वंजारी समाजानंतर माळी समाजाची मतदार संख्या असल्याचे म्हटले जात आहे. ज्या ज्या वेळी भीमराव धोंडे हे आमदार झाले त्या त्या वेळी या मतदार संघातील ओबीसी एक झालेला आहे. त्यानंतर यावेळी ओबीसी एक झाल्याचे दिसत आहे. तर माजलगावात वंजारी समाजानंतर धनगर, माळी समाज मोठ्या संख्येने आहे. माधव निर्मळ हे धनगर समाजातून येत असल्याने वंजारी समाजाचा सुध्दा त्यांना पाठिंबा मिळत आहे. ओबीसीमधील सर्वच घटक जातींनी निर्मळ यांना पुढे केल्याने सक्षम उमेदवार म्हणून आज त्यांच्याकडे पाहिले जाते. धोंडे आणि निर्मळ हे ओबीसींचे दोन्ही उमेदवार त्या त्या मतदार संघात सध्या पावरफुल्ल असल्याचे चित्र आहे.



### राज्यात २८ ऑगस्ट पर्यंत पावसाचे धुमशान

पुणेः नैऋत्य मान्सून महाराष्ट्रासह अनेक राज्यात सक्रिय झाला आहे. राज्यातील अनेक भागांत पुन्हा एकदा पावसाला सुरूवात झाली आहे. दरम्यान २८ ऑगस्ट पर्यंत पाऊस पडत राहणार असल्याची माहिती भारतीय हवामान विभागाकडून देण्यात आली आहे. या दरम्यान, महाराष्ट्रात अनेक ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. कोकण आणि घाट भागांतील काही ठिकाणी रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. दरम्यान या भागात विजांच्या

◀◀ पान २ वर

# कृषी महोत्सवाचा आज समारोप; कृषिमंत्री धनंजय मुंडे यांची उपस्थिती

## गोविंद महाराज गायकवाड यांच्या विनोदी भारुडातून होणार समाज प्रबोधन

**परळी वै. । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्याच्या परळी वैद्यनाथ शहरात मागील चार दिवसांपासून सुरू असलेल्या कृषी महोत्सवाचा सोमवार (दि. २६) रोजी दुपारी एक वाजता समारोप होणार असून राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे या प्रसंगी उपस्थित राहणार आहेत. कृषी महोत्सवाच्या समारोपप्रसंगी आळंदी देवाची येथील प्रसिद्ध**




**टीव्ही कलाकार व लोकप्रबोधन पर विनोदी भारुड सादरकर्ते गोविंद महाराज गायकवाड यांच्या विनोदी भारुडातून समाज प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.**

या समारोप समारंभास वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी चे कुलगुरू डॉक्टर इंद्रमणी मिश्रा, बीड जिल्हाधिकारी अविनाश पाठक, पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ, मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता देवी पाटील, आत्माचे

◀◀ पान २ वर

# महिलांवर अत्याचार करणाऱ्यांना सोडू नका, त्यांचा हिशोब करा!

## महिला अत्याचारावर पंतप्रधान मोदींचे कडक शब्दात भाष्य

**जळगाव । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत रविवारी जळगाव विमानतळ परिसरात 'लखपती दीदी' कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याठिकाणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री गिरीश महाजन, मंत्री गुलाबराव पाटील उपस्थित होते. या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलांवरील लैंगिक



अत्याचाराच्या मुद्द्यावर भाष्य केले. महिलांवरील होणारे अत्याचार अक्षम्य पाप आहे. अत्याचारासारखे क्रूर कृत्य करणाऱ्या नराधमाला कठोर शिक्षा होण्यासाठी महायुती सरकार कायदा कडक करत आहे. सरकार येईल जाईल पण जीवनाची रक्षा, नारीची प्रतिष्ठा ठेवली पाहिजे, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी केले.

महिलांवरील होणारे अत्याचार अक्षम्य पाप आहे. दोषी कोणीही असेल त्याला सोडू नका, त्याला कोणत्याही प्रकारे मदत

◀◀ पान २ वर

# पांडुरंगाच्या दर्शनाला जातो, पण गाजावाजा करत नाही–शरद पवार

**पंढरपुर । प्रतिनिधी**

मी आस्तिक की नास्तिक याबाबत बऱ्याचदा बोललं जातं असे शरद पवार म्हणाले. मी पांडुरंगाच्या दर्शनाला जातो, पण कधीही गाजावाजा करत नाही असे शरद पवार म्हणाले. पांडुरंगाच्या दर्शनाला गेल्यावर सगळ्या जगाला कळालं पाहिजे असं काही नाही असे पवार म्हणाले. मी प्रसिद्धीच्या

◀◀ पान २ वर



# हायवा पकडला; वाळू चोरांचे धाबे दणाणले

## जिल्हा वाहतूक शाखेकडून कारवाईचा धडाका

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील गोदापात्रातून मोठ्या प्रमाणात वाळूची चोरटी वाहतूक केली जात असून पोलिस अधिक्षक अविनाश बारगळ यांच्या आदेशाने जिल्हा वाहतूक शाखेने वाळू चोरांविरोधात मोहिम उघडली आहे. शनिवारी मध्यरात्रीनंतर पाडळसिंगी टोल नाक्यावर गेवराईकडून बीडकडे निघालेला वाळूने भरलेला हायवा जिल्हा वाहतुक शाखेने रात्रीच्या गस्तीदरम्यान पकडला आहे. ही कारवाई सपोनि सुभाष सानप यांच्या मार्गदर्शनाखाली

◀◀ पान २ वर




## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२३ ऑगस्ट २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ४.०० क्विंटल | २,६९८ | २,६९८ | २,६९८ |
| ज्वारी/हायब्रिड :८९.०० क्विंटल | १,९०० | ६,६७० | २,३४३ |
| मूग :२१.५० क्विंटल | ६,५०० | ७,३०० | ६,८९६ |
| तूर : १७.५० क्विंटल | ९,९३१ | ९,९३१ | ९,९३१ |
| उडीद : २.५० क्विंटल | ४,९०१ | ७,४०० | ६,१५० |
| बाजरी: ३९.०० क्विंटल | २,३१० | २,८०० | २,५४९ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: ४४.०० क्विंटल | ४,००० | ४,१५० | ४,१०५ |
| हरभरा: २.०० क्विंटल | ६,००० | ६,७१० | ६,३५५ |

# माझा नेता.. माझी ताकद..!

## गुरु–शिष्याचे दर्शन घडवणारी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांची सोशल मिडीयावरील पोस्ट

**बीड । प्रतिनिधी**

**मनात जिद्द असेल तर कार्यकर्ता हा किती मोठा होऊ शकतो, याचे जिवंत उदाहरण म्हणजे शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक हे आहेत. मुळूक यांनी सोशल मिडीयावर एक पोस्ट टाकली. ही पोस्ट खूपच बोलकी आहे. माझा नेता..माझी ताकद असे शिर्षक असलेली ही पोस्ट बरच काही सांगून जात होती. नेता आणि कार्यकर्त्याचं नातं काय असतं यातून दिसून येतं होतं. गुरु आणि शिष्याचे दर्शन घडवणारी ही सचिन मुळूक यांची ही पोस्ट आहे. अशा पोस्टमधून शिवसैनिकांचा उत्साह वाढणार हे मात्र नक्की.**

हा प्रसंग आहे परळीतील कृषी महोत्वसातील. शिवसेनेच्या वतीने रक्षाबंधनाचा कार्यक्रम ठेवला होता. मात्र अचानक मुख्यमंत्र्यांचा मार्ग बदल्याने मोठी अडचण झाली. हजारोंच्या संख्येने महिला कार्यकर्त्या आणि शिवसैनिक जमले होते. पण साहेबच येणार नसल्याने सर्वांचेच चेहरे पडले होते. अशा वेळी जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी कृषी महोत्सवाच्या व्यासपीठावर जावून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी कार्यक्रमाविषयी संवाद साधला. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी होकार

◀◀ पान २ वर

### जिल्हाप्रमुख पदापेक्षा मी सच्चा कार्यकर्ता–सचिन मुळूक

मी वयाच्या १७ व्या वर्षापासून पक्षाचे काम केले आहे. एकनिष्ठपणे काम करीत असताना पक्ष गावागावात कसा वाढेल, यासाठी मी प्रयत्न केला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब हे माझ्यासाठी दैवत आहेत. त्यांचा मी खर तर सच्चा कार्यकर्ता आणि शिवसैनिक आहे. पदापेक्षा मला पक्ष आणि माझा नेता महत्वाचा वाटतो, असे जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी सांगितले.




cmyk

## अग्रलेख

# काश्मीर निवडणूकीत काँग्रेसची सावधानता

जम्मू-काश्मीरमध्ये पुढच्या महिन्यात विधानसभेची निवडणूक होत आहे. पुन्हा एकदा हे राज्य राजकारणाकडे परतत आहे ही चांगली गोष्ट. वास्तविक लोकसभा निवडणुकीतही राज्यात चांगला उत्साह दिसून आला होता. मात्र, लोकसभेतील विजयी उमेदवार दिल्लीला जातात. विधानसभेची निवडणूक जिंकणारे आपल्या राज्याचे कारभारी असतात. त्यामुळे बऱ्याच काळानंतर आता विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने जम्मू-काश्मीरमध्ये रंगत निर्माण होणार आहे. तथापि, या निवडणुकांसाठी राजकीय पक्षांकडून कितीही दावे केले जात असले, तरी ते पूर्णत: सज्ज नाहीत हेही स्पष्ट दिसते आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह राज्याचा धावता दौरा केला. निवडणुका जाहीर झाल्यानंतरची त्यांची ही पहिलीच भेट. त्यात त्यांनी अत्यंत मोजका संवाद माध्यमांशी साधला.

निवडणुका जाहीर झाल्यावर राजकीय पक्षांच्या नेत्यांकडे बोलण्यासारखे बरेच असते. कोणत्याही मुद्द्यावरून ते अचाट विधाने करू शकतात. तसे राहुल अथवा खर्गे यांनी केले नाही. काँग्रेस कार्यकर्त्यांशी राहुल यांनी जो संवाद साधला, त्याला ठळक प्रसिद्धी मिळाली. पक्षाच्या लोकांशी जसे बोलावे लागते तेच राहुल बोलले. कार्यकर्त्यांचा उत्साह कायम ठेवायचा असतो. भारत जोडो यात्रा पार्ट १ आणि पार्ट २ च्या वेळी जी लाइन राहुल यांनी पकडली होती तीच त्यांनी आताही कायम ठेवली. तेव्हा 'मोहब्बत की दुकान' आदी शब्द ते वापरायचे. आता त्यात बदल करत तुम्ही ज्या भीतीत जगत आहात ती मला कायमची संपवायची आहे, असे ते म्हणाले. या दोघांनी नॅशनल कॉन्फरन्सच्या फारुख अब्दुल्ला आणि उमर अब्दुल्ला यांच्याशी चर्चा केली. फारूख अब्दुल्ला यांनी त्यांच्या चिरपरिचित फिल्मी स्टाइलने माध्यमांना खाद्य दिले. जम्मू-काश्मीरमध्ये काँग्रेसशी युती झाल्याची घोषणा त्यांनी करून टाकली. सर्व ९० जागा आम्ही लढवणार असल्याचेही ते म्हणाले. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष आमच्यासोबत आहेच, मात्र आपल्या पक्षातील सर्व नेतेही आपल्या सोबत असल्याचे त्यांना जाहीर करावे लागले. त्यामागचे कारण अर्थातच हे आहे की काश्मीरच्या संदर्भात आज कोणताही नेता ठामपणे काही बोलू शकत नाही. काश्मीरला पुन्हा राज्याचा दर्जा मिळेल अशी आम्हाला आशा असल्याचे ते स्वत:ला सांगत होते की पक्षाच्या नेत्यांना की राज्यातील जनतेला हा प्रश्न खरेतर स्वत: अब्दुल्ला यांनाही पडला असेल. काँग्रेसपासून फारकत घेत आपले वेगळे दुकान थाटून बसलेल्या गुलाम नबी आझाद यांनी लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळीच याबाबत स्पष्ट विधाने केली होती. खोटे बोलू नका अशा आशयाची टिप्पणी त्यांनी काश्मीरच्या नेत्यांना उद्देशून केली होती. त्याच सुमारास अशीही माहिती समोर आली होती की, दिल्लीतील भाजपच्या नेत्यांच्या प्रतिसादाची फारूख अब्दुल्ला वाट पाहात आहेत. त्याकरता त्यांनी दिल्लीत देव पाण्यात सोडले. त्यांनी व त्यांच्या पुत्राने या वावड्या असल्याचे म्हणत त्याचा इन्कार केला, मात्र, ज्या बातम्या आल्या होत्या त्या खोट्या नव्हत्या असे कोणीही सांगू शकेल.

विधानसभा निवडणुकीसाठी आता मंच सज्ज झाला आहे. त्याचवेळी हेही स्पष्ट झाले आहे की स्वबळावर सरकार स्थापन करू शकेल अशी ताकद कोणत्याच पक्षाकडे नाही. नॅशनल कॉन्फरन्सकडे ती असती तर त्यांनी इतक्या तातडीने काँग्रेसचा हात हातात घेतला नसता. जम्मू-काश्मीरमधील दुसरा कथित प्रबळ पक्ष आहे मेहबुबा मुफ्ती यांचा पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टी. मेहबुबा यांच्या पक्षाने बराच जनाधार गमावला आहे. तरीही कलम ३७० पुन्हा बहाल करण्याचे आश्वासन हा पक्ष देतो आहे. ते कशाच्या आधारावर असे बोलत आहेत हे तेच जाणो. भारतीय जनता पार्टीच्या गोटातही दोन दिवसांपूर्वी हालचाल झाली आहे. पीडीपी आणि भाजपला एकत्र आणणाऱ्या राम माधव यांची भाजपने पुन्हा जम्मू-काश्मीरच्या राजकारणात वापसी केली आहे. माधव कदाचित तशी वेळ आलीच आणि मदतीची आवश्यकता भासली तर सोयीचे ठरू शकतात हा त्यामागचा विचार असावा.

जम्मू भागात भाजपचा वरचष्मा कायम राहिला. तथापि, एकट्या जम्मूत सर्व जागा पक्षाला मिळवता येणार नाही व त्यामुळे बहुमताचा आकडाही गाठता येणार नाही. काँग्रेसचीही स्थिती फारशी वेगळी नाही. आझाद फॅक्टरचा त्यांना तोटा होणारच नाही असे नाही. आझादांसोबत गेलेली काही मंडळी पुन्हा स्वगृही परतली असली, तरी प्रत्येक नेत्याला मानणारा एक सामान्य वर्ग असतो. जम्मू भागानेही काँग्रेसला हात दिला, तर पक्ष उभारी घेऊ शकतो. तशी स्थिती आज दिसत नाही. निवडणुकीनंतर सरकार स्थापनेसाठी जुळवाजुळव करावीच लागणार आहे. आता एकत्र आलेले काँग्रेस आणि नॅशनल कॉन्फरन्स एकत्र राहतील याचीही शाश्वती नाही आणि मेहबुबा आणि भाजप एकत्र येणारच नाहीत याचाही दावा केला जाऊ शकत नाही. जम्मू-काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा दिला जाईल हा कळीचा मुद्दा ठरू शकेल याचीही हमी नाही. राहुल गांधी आणि खर्गे यांना याची जाणीव झाली आहेच. त्यामुळे अन्य राज्यांतील निवडणूकपूर्व उत्साह येथे त्यांनी दाखवला नाही. सज्ञता कोणाची हे म्हणताना खरेच कोणाची, हाही छुपा प्रश्न डोकावल्याशिवाय राहात नाही.

## अंबादास दानवेंची गजकेसरी स्टील कंपनीस भेट; दुर्घटनाप्रकरणी मालकावर गुन्हा दाखल करा

**जालना । प्रतिनिधी**

**जालन्यातील औद्योगिक परिसरात २४ ऑगस्ट रोजी गजकेसरी स्टील कंपनीत लोखंड वितळण्याच्या भट्टीत स्फोट झाला होता. या दुर्घटनेत ३४ कामगार भाजले आहे. रविवारी शिवसेना नेते तथा विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी या कंपनीस भेट दिली. कंपनीत झालेल्या स्फोटाच्या ठिकाणी पाहणी करून कामगारांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष करणाऱ्या कंपनी मालकावर गुन्हा दाखल करण्यात यावी अशी मागणी करण्यात येणार आहे.**



शनिवारी दुपारी कंपनीच्या एका भट्टीत झालेल्या स्फोटात ३४ जण जखमी झाले आहेत. त्यातील ७ जणांची प्रकृती अत्यंत गंभीर होती. त्यापैकी एक कामगाराचा रविवारी संभाजीनगरातील एका खाजगी रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. कंपनीतील कामगारांना वेठबिगारांपेक्षाही हलाखीचे जीवन जगावे लागत असल्याची माहिती पाहणी केल्यानंतर दानवे यांनी दिली. पाहणी दरम्यान कंपनी मालकाशी संवाद साधून कामगारांच्या सुरक्षतेची, सुरक्षा उपकरणाची व कंपनीत कामगारांना देण्यात येणाऱ्या सुविधांची दानवे यांनी माहिती घेतली. गजकेसरी कंपनी कडून औद्योगिक सुरक्षतेची कसलेही नियम या कंपनीत पाळल्या नसल्याने हा स्फोट झाल्याचे दिसून आले आहे. कामगारांच्या सुरक्षेतेची संपूर्ण जबाबदारी कंपनी मालकाची असल्याने त्यांच्या दुर्लक्षामुळे अपघात झाला असून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी राज्य सरकारकडे करणार असल्याचे अंबादास दानवे यांनी सांगितले. राज्यपातळीवर औद्योगिक सुरक्षा विभाग, उद्योग विभाग व कामगार विभागांना संबंधित घटनेत दोषी असणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी सूचना मी करणार असल्याचे दानवे म्हणाले. तसेच कंपन्या डिश विभागातील अधिकाऱ्यांना पाहणी करण्यासाठी कंपनीच्या आत मध्ये येऊ देत नसल्याची तक्रार माझ्याकडे आहे. त्यामुळे संपूर्ण कंपनीच्या टेक्निकल टीमच्या दुर्लक्षामुळे हा अपघात झाल्याची प्रतिक्रिया अंबादास दानवे यांनी दिली. याप्रसंगी जालना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर, ए. जे. बोराडे, माजी आमदार संतोष सांबरे, शहरप्रमुख बाळा परदेशी, देवनाथ जाधव व उद्योगपती घनश्याम गोयल उपस्थित होते.

## धामणगाव महसूल मंडळात पीक नुकसान भरपाईसाठी सरपंच खोटे व समीर शेख यांच्याकडून पाठपुरावा

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यात मागील दोन दिवसापासून सर्वत्र जोरदार पाऊस पडत आहे. त्याचा सर्वाधिक फटका धामणगाव महसूल मंडळातील बावी कापसी बीड सांगवी सह अनेक गावांना बसला आहे. या महसूल मंडळात गेल्यावर्षीही जोरदार पाऊस होऊनही पर्जन्यमापक धामणगावात असल्याने.. महसूल मंडळातील दूरच्या गावांत पिकांचे पाऊसामुळे नुकसान होऊनही शासनाचे निकषात बसत नसल्यामुळे नुकसान भरपाई व विमा भेटू शकला नाही.



आठ दिवसापासून होत असलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या सर्वच पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. सांगवी पाटण गावचे सरपंच दत्तात्रय खोटे, सामाजिक कार्यकर्ते समीर शेख, यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन उभ्या पिकाच्या लुकसानीची पाहणी करून, आमदार सुरेश धस यांच्या कानावरती शेतकऱ्यांची व्यथा मांडली. अण्णांनी लगेच वरिष्ठ पातळीवरती पाठपुरावा करून संबंधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई व पिक विम्याची रक्कम मिळेल. यासाठी पाठपुरावा सुरु केला आहे .तरी सर्व शेतकरी बांधवांना आवाहन आहे की पिक विमा कंपनीकडे तक्रार नोंदवून घ्यावी. जेणेकरून एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही. त्या सोबत शासन दरबारी पंचनामा करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. लवकरच शासनामार्फत पंचनामे होतील यासाठी पाठपुरावा करत आहोत असे सामाजिक कार्यकर्ते पत्रकार समीर शेख यांनी सांगितले.

## गभा.भीमबाई भागूजी उकिरडे यांचे निधन

**अंबड । प्रतिनिधी**



अंबड नगर परिषदेचे मुख्याधिकारी मनोज विष्णुपंत उकिरडे यांच्या आजी गभा.भीमबाई भागूजी उकिरडे याचे २५ ऑगस्ट रोजी रात्री ६.५५ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांच्या पश्चात तीन मुले व दोन मुलीसह नातु असा मोठा परिवार असून त्यांचा अंत्यविधी दि.२६ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता ढोर जळगांव ता शेवगाव येथे ढोरा नदी काठी होणार आहे.

## गजकेसरी स्टील कंपनी स्फोट प्रकरण व्यवस्थापकीय संचालकासह तिघांना न्यायालयीन कोठडी

**जालना। प्रतिनिधी**

जालना, येथील अतिरिक्त औद्योगिक वसाहतीत गजकेसरी स्टील कंपनीमध्ये शनिवारी दुपारी बायलरचा स्फोट होऊन तेथील २२ कामगार जखमी झाले. याप्रकरणी चंदनझिरा पोलिसांनी कंपनीचे मालक दिलीपकुमार चंद्रमोहन झा यांच्यासह, सुधाकर किशोर राय, लालसिंग प्रजापती अशा तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करून तिन्ही आरोपींना अटक केली आहे. तसेच या प्रकरणी मुख्य जबाबदार असलेले मालकावर गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात येत आहे व तसेच नार्कोटेस करण्यात यावी असे काही तज्ञ यांच्याकडून बोलल्या जात आहे. तसेच आतापर्यंत गजकेसरी कंपनीमध्ये किती लोकांचे बळी गेली याचेही तपासणी होणे गरजेचे आहे तसेच या कंपनीमध्ये सर्व ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे असणे गरजेचे आहे. सीसीटीव्ही कॅमेरे का लावण्यात येत नाही असंही उलट सुलट चर्चा सुरू आहे. याप्रकरणी या कंपनीचे राम अगरवाल आणि लखन अगरवाल यांचा काय संबंध होता तिचीही चौकशी होणे गरजेचे आहे. मुख्य मालक राम आणि लखन हेच दोघे होते असं बोलल्या जात आहे. याप्रकरणी

शनिवारी स्फोटाच्या घटनेनंतर जखमींपैकी मोहम्मद रफिकोद्दीन मोहम्मद अली यांनी दिलेल्या फिर्यादीवरून चंदनझिरा पोलिस ठाण्यात कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक दिलीपकुमार झा, भट्टी निरीक्षक किशोर राय आणि क्रेन आपरेटर लालसिंग प्रजापती अशा तिघांविरुद्ध भादंवि १०६,२८९, १२५ अ,२२५ ब कलमान्वये गुन्हा दाखल करून तिन्ही आरोपींना अटक केली. दरम्यान, रविवारी या तिन्ही आरोपींना पोलिसांनी न्यायालयासमोर हजर केले असता, न्यायालयाने आरोपींना न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. या प्रकरणाचा अधिक तपास चंदनझिरा ठाण्याचे पोलिस निरीक्षक राजपूत हे करीत आहेत.



## पान १वरून...

### अजित दादांच्या दोन

आपल्याला १ लाख ७ हजार मते मिळाल्याने भाजपच्या तत्कालीन प्रदेशाध्यक्षांनी पुन्हा निवडणुकीसाठी तयारीला लागा असे त्यावेळी सांगितले होते. तेव्हापासून आम्ही तयारी करीत आहोत, असे सांगून पक्ष आपल्यालाच उमेदवारी देई असे सांगितले. तसेच विद्यमान आमदारांना मतदार संघात जनतेचा अल्प प्रतिसाद असल्याचे सांगून उमेदवारी मिळाली नाही तर कार्यकर्त्यांची बोलून निर्णय घेऊ, असे सांगितले. त्यामुळे आ. आजबे यांचे धाबे दणाणले असून ओबीसी नेते धोंडे यांच्या निवडणुक लढवण्याच्या निर्धारामुळे धस आणि आजबे यांना मोठा धक्का आहे. आष्टी प्रमाणे माजलगाव मतदार संघातही राजकीय स्थिती निर्माण झाली असून अजित पवार गटाचे आ. प्रकाश सोळंके यांचे पुतणे जयसिंह सोळंके यांची डोकेदुखी वाढली असून ओबीसी नेते व अजित पवार गटाचे नेते माधव निर्मळ यांनी गेल्या दोन ते तीन महिन्यापासून विधानसभा निवडणुकीची तयारी सुरु केली आहे. आतापर्यंत त्यांनी मतदार संघ पिंजून काढला आहे. माधव निर्मळ हे कृषीमंत्री धनंजय मुंडे आणि आ. पंकजा मुंडे यांचे विश्वासू आहेत. कोणत्याही परिस्थितीत निवडणुक लढवायचीच असा निर्धार केल्याने सोळंके काका -पुतण्याची डोकेदुखी वाढली आहे. शिवाय माधव निर्मळ यांना मतदार संघातून मिळणारा पाठिंबा पाहता विरोधकांनी त्यांचा धसका घेतला आहे. आष्टी आणि माजलगाव मतदार संघात महायुतीमधील ओबीसी नेत्यांनी महायुतीच्याच आमदारांविरोधात दंड थोपटल्याने आता मराठा विरुध्द ओबीसी असा संघर्ष वाढताना दिसत आहे. याचा फटका अजित दादांच्या दोन आमदारांना येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत बसेल, असे संकेत आहेत.

-------------

### सरकारचा

मोदी सरकारने घेतलेल्या काही निर्णयांवर आक्षेप घेतल्यानंतर आणि प्रतिवादानंतर निर्णय मागे घेण्यात आले. यामध्ये दीर्घकालीन भांडवली नफा/इंडेक्सेशन, वक्फ विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे पाठवणे, प्रसारण विधेयकाचा मसुदा मागे घेणे आणि नोकरशाहीमध्ये पार्श्विक प्रवेश रद्द करणे यासंबंधीच्या बजेटमध्ये रोलबॅक आदी निर्णय असल्याचेही त्यांनी एक्सवरील ट्विटमध्ये सांगितले. आम्ही उत्तरदायित्व सुनिश्चित करत राहू आणि या निरंकुश सरकारपासून १४० कोटी भारतीयांचे संरक्षण करू, असेही यावेळी त्यांनी म्हटले आहे. देशभरात इंडिया आघाडीने पुन्हा एकदा जुनी पेन्शन योजना लागू करण्याचे आश्वासन दिले होते. या जुनी पेन्शन योजना अंतर्गत, सेवानिवृत्त सरकारी कर्मचाऱ्यांना त्यांच्या शेवटच्या काढलेल्या पगाराच्या ५० टक्के मासिक पेन्शन म्हणून मिळते. महागाई भत्ता दरांमध्ये वाढ झाल्यामुळे रक्कम वाढतच जाते. ओपीए आर्थिकदृष्ट्या परवडण्यासारखी नाही. तसेच या योजनेमुळे सरकारी तिजोरीवर भार वाढतच जातो.

----------

### महिलांवर अत्याचार करणाऱ्यांना

करणारे वाचले नाही पाहिजे. सर्व राज्य सरकारे आणि राजकीय पक्षांना सांगतो, महिलांवर अत्याचार करणाऱ्यांवर कठोर शिक्षा देण्यासाठी आमचे सरकार कायदा कडक करत आहे. रुग्णालय, शाळा, पोलीस व्यवस्था, कोणत्याही ठिकाणी निष्काळजीपणा होत असेल तर हिशोब करा. वरपर्यंत मेसेज जाऊ द्या. हे पाप अक्षम्य आहे. महिलांवर अत्याचार करणाऱ्यांना सोडू नका त्यांचा हिशोब करा, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले. त्याचबरोबर, तक्रारीच्या वेळेत एफआयआर होत नाही, सुनावणी होत नाही, खटला उशिरा सुरू होतो, निर्णय उशिरा येतो. या अडचणी भारतीय न्याय संहितेतून दूर केल्या आहेत. काही पीडित महिला पोलीस ठाण्यात तक्रार करण्यासाठी घाबरतात. त्यामुळे आता ई-एफआयआर सुविधाही सुरु केली आहे. तसेच ई एफआयआरमध्ये कोणी छेडछाड करणार नाही याचीही व्यवस्था केली आहे. त्यामुळे चौकशी चांगली होईल आणि दोषींवर शिक्षा करण्यास मदत होईल, असेही मोदी यांनी सांगितले. यावेळी नेपाळमध्ये झालेल्या बस दुर्घटनेत जळगाव जिल्ह्यातील भाविकांचा मृत्यू झाला आहे. त्या मृतांना पंतप्रधानांनी श्रद्धांजली वाहिली. ते म्हणाले, नेपाळ दुर्घटनेत आपण जळगावमधील अनेक सहकाऱ्यांना गमावले आहे. मी या लोकांच्या कुटुंबाप्रती संवेदना व्यक्त करतो. ही दुर्घटना झाल्यावर भारत सरकारने नेपाळ सरकारशी संपर्क साधला. आपण राज्यमंत्री रक्षा खडसे यांना लगेच नेपाळला पाठवले. जे लोक राहिले नाहीत, त्यांच्या पार्थिवांना आपण वायूसेनेच्या विमानाने आणले. जे जखमी आहेत, त्यांच्यावर चांगले उपचार सुरू आहेत.

**नव्या कायद्यात लैंगिक शोषण करणाऱ्याला फाशी**

नव्या फौजदारी कायद्यात अल्पवयीन मुलींवरील लैंगिक शोषणावर फाशी आणि जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद केली आहे. लग्नाच्या नावाने मुलींची फसवणूक केली जायची. त्यावर शिक्षा होत नव्हती. आता यावर आम्ही कायदे केले आहेत. महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी केंद्र सरकार महिलांच्या सोबत आहे. राज्याच्या सोबत आहे. अत्याचार करणारी मानसिकता आपल्याला दूर करायची आहे, असेही ते म्हणाले.

------------

### कृषी महोत्सवाचा आज समारोप;

संचालक अशोक किरनाळी विभागीय कृषी सहसंचालक साहेबराव दिवेकर, डॉ.तुकाराम मोटे, ज्येष्ठ नेते वाल्मीक अण्णा कराड, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती असणार आहे.

**पाचव्या दिवशीही राज्यातून गर्दी**

दरम्यान रविवारी कृषी महोत्सवाच्या पाचव्या दिवशीही राज्यभरातून हजारो शेतकरी बांधव परळीत दाखल झाले असून कृषी महोत्सवास आजही उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून आला. कृषी प्रदर्शन, पशुप्रदर्शन यासह उमेदअंतर्गत उभारण्यात आलेल्या बचत गटांच्या स्टॉल्सच्या माध्यमातून कोट्यावधी रुपयांची खरेदी विक्री उलाढाल झाली असून शेतकरी बांधव तसेच विविध कंपन्या आणि महिला बचत गटांना याचा लाभ मिळाला आहे.

**तांत्रिक चर्चा सत्र ०४ दिनांक २५/०८/२०२४**

अध्यक्ष : डॉ. के. एस बेग, संचालक, संशोधन, व. ना. म. कृ. वि., परभणी, संकलक : डॉ. सचिन सूर्यवंशी, कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, तुळजापूर.

**रेशीम शेती**

डॉ. चंद्रकांत लटपटे, प्रमुख, रेशीम शेती संशोधन केंद्र, वनामकृवि, परभणी यांनी रेशीम शेती व्यवस्थापन या बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. सोयाबीन, कापूस, ऊस इ. एकच पीक पद्धती धोकादायक असून त्यासाठी रेशीम शेती ही एक पर्यायी पीक पद्धत आहे. या मार्गदर्शनात रेशीम शेती करीता शेड उभारणी, कोष काढणी व महाराष्ट्रातील कोष खरेदी केंद्र आणि तसेच रेशीम शेती करिता शासकीय योजना याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली.

**शेतीमध्ये जोडधंदा म्हणून पशुधनाचे महत्व**

डॉ. दत्ता बैनवाड, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, वनामकृवि, परभणी यांनी शेतीस जोडधंदा म्हणून गोवंश, म्हैसवंश, शेळीवंश, मेंढीवंश व कुक्कुटपालन या शेतीपूरक व्यवसायाची सविस्तर माहिती दिली. गोवंश हा खात्रीलायक शाश्वत उत्पन्न देणारा व्यवसाय आहे. या मार्गदर्शनात त्यांनी गाय, म्हैस, शेळी, मेंढी व कोंबडी यांच्या देशी व विदेशी जाती विषयी माहिती दिली. तसेच पशुधन संगोपन, आहार व आरोग्य व्यवस्थापन याविषयी मार्गदर्शन केले.

**उत्ती संवर्धन रोपे**

श्री. रवी गवळी, जैन इरिगेशन प्रा. लि. जळगाव यांनी जैन कंपनीमार्फत तयार करण्यात येणारे केळी, डाळिंब, व मोसंबी, या फळ पिकांच्या विविध वाणांचे उत्ती संवर्धित रोपे याविषयी माहिती दिली. तसेच शेतकऱ्यांना फळबाग लागवडी करिता रोग विरहित उत्ती संवर्धित रोपे व ठिबक सिंचन संचाचा वापर करावा असे आवाहन केले.

**भाजीपाला संरक्षित शेती**

डॉ. विश्वनाथ खंदारे, विभाग प्रमुख, उद्यानविद्या विभाग,वनामकृवि, परभणी यांनी बदलत्या हवामानमध्ये भाजीपाला लागवडीकरीता उपयुक्त संरक्षित शेती/नियंत्रित शेती याविषयी मार्गदर्शन केले. संरक्षित शेतीमुळे नियंत्रित तापमान, आर्द्रता, वनस्पती आवश्यकता नुसार प्रकाश, उत्पादन वाढ, उत्तम उत्पादन, कीटक व रोगापासून संरक्षण, लवकर परिपक्वता, प्रतिकूल हवामानात लागवड शक्य इ. गोष्टी सहज शक्य असल्याचे नमूद केले. या मार्गदर्शनात त्यांनी शेडनेट उभारणीसाठी लागणारा खर्च व शेडनेटची विविध प्रकार याविषयी माहिती दिली.

**सोयाबीन व हरभरा लागवड तंत्रज्ञान**

डॉ. वसंत सूर्यवंशी, कृषिविस्तार विद्यावेत्ता, अंबाजोगाई यांनी सोयाबीन पिकांची वाढ नियंत्रित करण्याकरिता संजीवकांचा वापर व सोयाबीन मधील कीड व रोग नियंत्रण या विषयी मार्गदर्शन केले. तसेच हरभरा पिकातील मर रोगाचा प्रादुर्भाव नियंत्रित करण्याकरिता आवश्यक पंचसूत्री शेतकऱ्यांना सांगितली.

**कोरडवाहू शेतीकरिता आवश्यक रुंद वरंबा व सरी तंत्रज्ञान**

डॉ.सचिन सूर्यवंशी, कार्यक्रम समनव्यक, कृषि विज्ञान केंद्र, तुळजापूर यांनी कोरडवाहू शेतीमध्ये सोयाबीन पिकाकरिता जास्त व कमी पावसामध्ये उपयुक्त रुंद वरंबा व सरी पेरणी पद्धती बाबत सखोल मार्गदर्शन केले. तसेच रुंद वरंबा व सरी पद्धत्तीमुळे उत्पादन खर्चात १५ ते २० टक्के घट होऊन उत्पादन २० ते २३ टक्के पर्यंत वाढते असे नमूद केले व शेतकरी बांधवाना या पद्धतीचा वापर करावा असे आवाहन केले. सदरील परिसंवाद दरम्यान प्रगतशील शेतकऱ्यांचा त्यांनी शेतीमध्ये राबविलेल्या नावीन्यपूर्ण उपक्रमाकरिता सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले. या परिसंवादाचे सूत्रसंचालन डॉ. वसंत सूर्यवंशी, विस्तार कृषि विद्यावेत्ता, अंबाजोगाई यांनी तर संकलन व आभार प्रदर्शन डॉ. सचिन सूर्यवंशी, कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, तुळजापूर यांनी केले.

------------

### पांडुरंगाच्या दर्शनाला जातो, पण

भागात कधी पडत नसल्याचे शरद पवार म्हणाले. आपल्या संतानी लिहलेले धन ही महाराष्ट्राची जमेची बाजू असल्याचे मत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी व्यक्त केलं. वारकरी कशाचीही पर्वा न करता पिढ्यान पिढ्या पंढरीची वारीसाठी माऊलींच दर्शन घेऊन पंढरपूकडे विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी निघतात असे पवार म्हणाले. मी देखील पांडुरंगाचे दर्शन घ्यायला जातो, पण मी कधीही गाजावाजा करत नाही. पांडुरंगाचं दर्शन करायला जातो हे काय जगाला सांगायचं गरज नाही. प्रसिध्दीपेक्षा दर्शन समाधानकारक असतं असेही शरद पवार म्हणाले. पांडुरंगाच्या नावाने व्यवसाय करणाऱ्या घटकांना मी पांडुरंगाचा भक्त मानत नाही असेही शरद पवार म्हणाले. देशात एक सामाजिक ऐक्य निर्माण करण्यासाठी नामदेव महाराजांचे महत्त्व आहे. संतांनी लिहलेले धन याचे आपण जतन केलं पाहिजे. पंढरीच्या वारीमध्ये वारकरी कधीही कुठल्या विषयाचा विचार करत नाही. पांडुरंगाचे दर्शन होवो किंवा नाही नामदेव पायरीचे दर्शन व्हावे ही त्यांची इच्छा असते असे शरद पवार म्हणाले.

---------

### माझा नेता.. माझी

दिला. गाड्यांचा ताफा नियोजित मार्गाने जात असनाता परळीतील शिवाजी चौकात अचानक मुख्यमंत्र्यांची एकच गाडी कार्यक्रमाच्या दिशेने वळली आणि सुरक्षा यंत्रणा सुध्दा चकित झाली. सचिन मुळूक यांच्या आग्रहाखातर मुख्यमंत्री कार्यक्रमाच्या ठिकाणी पोहचले आणि कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. सचिन मुळूक हे बीडमधील सामान्य कुटूंबातील असून वयाच्या १७ व्या वर्षीपासून ते शिवसैनिक आहेत. विद्यार्थी सेनेचे जिल्हाप्रमुख ६ वर्ष, शिवसेना उपजिल्हाप्रमुख ५ वर्ष आणि शिवसेना जिल्हाप्रमुख ६ वर्ष राहीले आहेत. २००४ ते २०१७ पर्यंत त्यांनी पक्षाचे काम करताना ज्ञानार्जनाचे कामही केले. जिल्हाप्रमुख असताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जी भुमिका घेतली त्यात त्यांच्यासोबत राहत पक्षाचे ईमाने ईतबारे काम करीत आज बीड जिल्ह्यात सर्वच तालुके आणि विधानसभा मतदार संघात पक्षाची ताकद वाढवली आहे. याची जाणीव सुध्दा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना असल्याने अनेकवेळा सचिन मुळूक यांना बीड जिल्हयातील प्रश्नासाठी त्यांनी मुबलक वेळ दिलेला आहे. माझा नेता..माझी ताकद या शिर्षकाखाली सचिन मुळूक यांनी सोशल मिडीयावर पोस्ट टाकली. त्यांची ही पोस्ट शिवसैनिकांचा उत्साह वाढवणारी असून कार्यकर्त्यांनि आपला नेता आणि पक्षाशी बांधिल राहत एकनिष्ठ राहीले पाहिजे, हा संदेश यातून देण्याचा मुळूक यांचा कौतूकास्पद प्रयत्न आहे. त्यांच्या या प्रयत्नातून निश्चितच शिवसैनिकांचा उत्साह वाढणार हे मात्र नक्की.

-----------

### राज्यात २८ ऑगस्ट

कडकडाटासह मेघगर्जनेचीही शक्यता आहे. यानंतर बुधवार २८ ऑगस्टपासून गंभीर हवामानाची तीव्रता कमी होऊन पावसाचा जोर ओसरणार असेही हवामान विभागाने सांगितले आहे. या संदर्भातील माहिती पुणे हवामान विभागप्रमुख डॉ.के. एस.होसाळीकर यांनी एक्स पोस्ट वरून दिली आहे. राज्यातील सर्वच जिल्ह्यांना मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. पुणे, मुंबई, पालघरसह १२ जिल्ह्यांना अतिमुसळधारेचा ऑरेंज अलर्ट, तर कोल्हापूरसह २८ जिल्ह्यांना मुसळधारेचा यलो अलर्ट दिला आहे. बंगालच्या उपसागरासह अरबी समुद्रातही कमी दाबाचे पट्टे तयार होत असल्याने मान्सूनचे वारे प्रचंड वेगाने सक्रिय झाले आहे. त्यामुळे राज्यात मान्सून जोरदार बरसणार असल्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.

---------

### हायवा पकडला; वाळू चोरांचे

करण्यात आली. वाळूची चोरटी वाहतूक गोदापात्रातून मोठ्या प्रमाणात सुरु असून परवाना नसताना वाळूची तस्करी केली जात असून यातून शासनाचा लाखोंचा महसुल बुडवला जात आहे. गोदापात्रातून ही वाळू बीड शहरासह तालुक्यात जास्त प्रमाणात आणली जात असून पोलिस अधिक्षक अविनाश बारगळ यांच्या आदेशानुसार गेल्या काही दिवसापासून जिल्ह वाहतूक शाखेने रात्रीच्या गस्तीदरम्यान वाळूची चोरटी वाहतुकीवर निर्बंध घालण्याचा प्रयत्न केला आहे. दि. २४ ऑगस्ट रोजी मध्यरात्रीनंतर जिल्हा वाहतूक शाखेचे सपोनि सुभाष सानप आणि त्यांचे सहकारी गेवराई उपविभाग हद्दीत गस्त घालण्यासाठी गेले होते. पाडळसिंगी टोल नाक्याजवळ थांबल्यावर गेवराईहून बीडकडे एक हायवा येत होता. त्यास थांबवून चौकशी केली तर त्याच्याकडे वाळूचा वाहतूक परवाना नसल्याचे आढळून आले. हायवा (क्र. एम.एच. १२, एफ-४९९७) हा २० लाख किमतीचा व १५ हजार किमतीची वाळू असा २० लाख १५ हजार रुपयाचा मुद्देमाल पोलिस मुख्यालयास जमा केला. या प्रकरणी चालक वैजिनाथ तुकाराम पोकळे (वय-४५, रा. घोसापुरी, ता. बीड) गेवराई पोलिसात पोह नितीन शिंदे यांच्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस अधिक्षक अविनाश बारगळ, अप्पर पोलिस अधिक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि सुभाष सानप, पोह सहाय्यक फौजदार मिसाळ, पवार यांनी केली.

# पीकविम्यासाठी किमान दहा गुंठे क्षेत्राचे बंधन येणार

शेतकऱ्याला न सांगता एक गुंठ्यापेक्षाही कमी जागेत पीक असल्याचे भासवून बनावट विमा अर्ज दाखल केले जात असल्याचा संशय कृषी विभागाला आहे. त्यामुळे विमा काढण्यासाठी किमान दहा गुंठे पीकक्षेत्र बंधनकारक करावे, असा प्रस्ताव राज्य शासनाला देण्याच्या हालचाली सुरू आहेत.

पंतप्रधान पीकविमा योजनेसाठी विविध सार्वजनिक सेवा केंद्रांकडून (सीएससी) तसेच इतर मार्गाने विमा अर्ज दाखल होतात. यापूर्वीच्या अर्जांची, मंजूर झालेल्या दाव्यांची छाननी सध्या कृषी विभाग करतो आहे. दहा गुंठ्यांपेक्षा कमी पीकक्षेत्र असलेले ६.२९ लाख अर्ज छाननीत आढळून आले आहे. विशेष म्हणजे २० हजारांहून अधिक अर्जांमध्ये विमा संरक्षित क्षेत्र एक गुंठ्यापेक्षाही कमी आहेत. एक गुंठ्यापेक्षाही कमी जागेत खरिपाची पिके घेण्याचा प्रयत्न शेतकरी शक्यतो करीत नाहीत. त्यामुळे या अर्जांमधील माहितीच्या सत्यतेबाबत संशय असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. ''शेतजमिनीचे क्षेत्र दहा गुंठ्यांच्या खाली असल्यास कायद्यानुसार खरेदी-विक्रीचा व्यवहार होत नाही. त्यामुळे पीकविमा काढताना पिकाचे संरक्षित क्षेत्रदेखील किमान दहा गुंठे ठेवणे संयुक्तिक ठरू शकेल. शेतकऱ्यांच्या नावाखाली बनावट सातबारा उतारे तसेच अन्य कागदपत्रे तयार करण्याचे व त्यामाध्यमातून विमा नुकसान भरपाई लाटण्याचे प्रकार होत आहेत काय, याची व्यापक तपासणी होण्याची गरज आहे. विशेष म्हणजे ५७० अर्जांमध्ये पीकविमा संरक्षित क्षेत्र चक्क २० हेक्टरच्या पुढे दाखविण्यात आले आहे. या अर्जांचीही तपासणी करावी लागेल,'' अशी माहिती एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याने दिली. पीकविमा योजनेत एक गुंठ्याच्या पेक्षाही कमी जमीन दाखवल्यास नुकसान भरपाईदेखील कमी मिळते. अशा प्रकरणात ५० रुपये, ७० रुपये अशा नगण्य नुकसान भरपाईचा आकडा दिसतो व यातून शासनावरच टीकेची झोड उठवली जाते. त्यामुळे पीकविमा संरक्षित क्षेत्राबाबत मर्यादा निश्चित करायला हवी, असे कृषी विभागाला वाटते आहे.




## ७८५ दाव्यांमध्ये वाटले अडीच कोटी रुपये

विमा कंपन्यांनी ७८५ दाव्यांमध्ये तब्बल दोन कोटी ४५ लाख रुपये वाटल्याचे निष्पन्न झाले आहे. यामध्ये कंपन्यांनी चूक केली की विमा प्रस्तावच बनावट सादर झाले, याचाही शोध घेतला जात आहे. ''खोटी माहिती देत विमा भरपाई उकळल्याचे निष्पन्न झाल्यास आम्ही फौजदारी कारवाई करण्याचा निर्णय घेऊ,'' असे कृषी विभागातील एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याने स्पष्ट केले.

एका बाजूला नगण्य भरपाईच्या बातम्या येत असताना दुसऱ्या बाजूला काही अर्जांमध्ये चक्क १२ ते १३ लाख रुपये इतकी अफाट भरपाई मंजूर झाल्याचीही उदाहरणे आहेत. भरमसाट नुकसान भरपाई मिळालेल्या अर्जांचाही अभ्यास आता कृषी खात्याने सुरू केला आहे. जोशी नावाने एका दाव्यात १३.२२ लाख रुपये, अग्रवाल नावाच्या एका दाव्यात ३.४० लाख रुपये, तर देशमुख नावाने आणखी एका दाव्यात ३.८० लाख रुपये बँक खात्यात जमा झाल्याचे अभ्यासात आढळले आहे. यामुळे पीकविमा योजनेच्या मूळ हेतूला हरताळ फासला जात असल्याचे दिसून येत आहे.

# साखर नियंत्रण आदेशात तांत्रिक सुधारणा होणार



नवी दिल्ली : गेल्या सहा दशकांपासूनच्या साखर उत्पादन, साठवण आणि किंमत निर्धारण नियमनात लवकरच तांत्रिक सुधारणा करण्यात येणार आहे. केंद्र सरकारने 'साखर नियंत्रण आदेश - २०२४'चा मसुद्यावर अभिप्राय मागितले आहेत.

केंद्रीय ग्राहक संरक्षण, अन्न आणि सार्वजनिक वितरण विभागाने 'साखर (नियंत्रण) आदेश - २०२४' नुकताच (ता.२२) जारी केला आहे. साखर उत्पादन प्रक्रियेतील तांत्रिक प्रगतीमुळे १९६६ च्या साखर (नियंत्रण) आदेशाचे पुनरवलोकन करण्याचा मंत्रालयाचा प्रस्ताव आहे. 'गेल्या सहा दशकांत साखर क्षेत्रात अनेक बदल झाले आहेत, ज्यामुळे विद्यमान साखर (नियंत्रण) आदेश, १९६६ मध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे,' असे मंत्रालयाने मसुदा जारी करताना म्हटले आहे. साखर उत्पादन, विक्री, साठवणीसह उत्पादक आणि घाऊक विक्रेते यांच्यावर नियंत्रण ठेवण्याच्या केंद्र सरकारच्या अधिकाराची माहिती या मसुद्यात देण्यात आली आहे. २३ सप्टेंबरपर्यंत या मसुद्यावर भागधारकांचे अभिप्राय मंत्रालयाने मागविले आहेत. साखरेच्या किमतींचे नियमन करण्याच्या अधिकारावर मसुद्यात म्हटले आहे, की केंद्र सरकार, विक्रीसाठी साखरेच्या किमतीबाबत कोणताही आदेश जारी करताना, उसाची वाजवी आणि किफायतशीर किंमत (एफआरपी), ऊस/बीटरूटपासून साखरेच्या निर्मितीसाठी येणारा सरासरी उत्पादनाचा अंदाजे खर्च, साखर उत्पादन प्रक्रियेत निर्माण झालेल्या उप-उत्पादनांमधून सरासरी मिळालेला महसूल, या मुद्द्यांना विचारात घेईल. तसेच 'उत्पादकाला देण्यात आलेल्या परवान्यात नमूद अटींशिवाय उसापासून साखर आणि त्याचे उपपदार्थांचे उत्पादन केले जाऊ नये, असे आदेश केंद्र किंवा राज्य सरकार जारी करू शकते, असे मसुद्यात म्हटले आहे. साखर उत्पादनाच्या संदर्भात तपासणी, प्रवेश, शोध, नमुने आणि जप्ती यासंबंधीच्या सरकारच्या अधिकारांचाही तपशील या मसुद्यात देण्यात आला आहे. उत्पादक आणि घाऊक विक्रेते (डीलर्स) यांच्याकडील साखरेची विक्री, साठवणूक आणि विल्हेवाट यावर निर्बंध घालण्याचे केंद्र सरकारचे अधिकार हे देखील मसुद्यात स्पष्ट करण्यात आले आहेत.

# चार गायींच्या संकरापासून निर्मित 'राठी' गाय फायद्याचीच




दूध उत्पादक शेतकऱ्यांसाठी जास्तीत जास्त दूध देणारी गाय महत्वाची असते. पण जर या गायीला खर्च कमी येत असेल तर अजूनच सोने पे सुहागा! अशाच एका उपयुक्त गायीचे नाव आहे राठी गाय. राठ समाजाने थारपारकर, लाल सिंधी तथा साहिवाल आणि धन्नी या भारतीय गोवंशाचे संकर करून 'राठी' या गोवंशाची निर्मिती केली.

राठ नावाच्या भटक्या मुस्लिम जमाती ने याचे मोठ्या प्रमाणावर संगोपन केले आहे, त्यामुळे या गोवंशाला 'राठी' किंवा 'राठ' असे नाव पडले. देशी गायींमध्ये राठी जातीची गाय ही फार चांगली मानली जाते. राजस्थानच्या बीकानेरपासून ते पंजाबच्या सीमेपर्यंतच्या प्रदेशात आढळणाऱ्या या गायीला राजस्थानची कामधेनूही म्हटले जाते. या जातीच्या गायी देशाच्या अनेक भागात सहज दिसतात. उत्तर प्रदेशात शेतकरी या गायी कमी किमतीत विकत घेऊन पाळतात. या गायींची किंमत २० हजार रुपयांपासून ६० हजार रुपयांपर्यंत आहे. साहिवाल गायीशी मिळते जुळते गुणधर्म या गायीचे आहेत. इतर गाई पेक्षा दूध देण्याची क्षमता या गाईंची जास्त असते. जर वातावरण पोषक असेल तर पशुपालक या गाईंपासून जास्तीचे दुधाचे उत्पन्न मिळवू शकतात.

शरीर रचना :राठी गाय ही तिच्या रंगाने आणि आकाराने दिसायला आकर्षक आहे. या गोवंशाचा आकार मध्यम असून अंग भरीव असते. या गोवंशाचे डोके मोठे असून कपाळ रूंद आणि पसरलेले असते. डोळे काळे आणि पाणीदार असतात. कान छोटे असून आतील बाजूस लालसर तपकिरी असतात. या गोवंशाची मान थोडी आखूड असून गळकंबळ किंवा पोळी थोडी मोठी आणि आखीव असते. पाय सामान्य आकाराचे असून खुर मात्र मोठे आणि काळे असतात. शेपटी लांब असून शेपुटगोंडा झुपकेदार, केसाळ आणि काळ्या रंगाचा असतो. या गोवंशाचा रंग लाल-तांबडा असून त्यावर पांढरे डाग असतात आणि पोटाशी रंग फिक्कट होत गेलेला असतो. या जातीच्या गायीची उंची सुमारे १४४ सेंटीमीटरपर्यंत आहे. याशिवाय राठी जातीच्या गायीचे वजन सुमारे ३०० किलो असते. या जातीच्या बैलाचे वजन सुमारे ३५० किलो असते.

दूध उत्पादन :देशी जातीच्या गायीत राठी गाय ही दूध उत्पादनात सर्वात महत्त्वाची मानली जाते. या जातीची गाय ही एक वर्षाला सुमारे २८०० किलो दूध देते. वयाच्या ३६ ते ५२ व्या वर्षी राठी गाईचे पहिले दुग्धपान सर्वोत्तम मानले जाते. त्यानंतर ते दररोज ८ ते १८ लिटर दूध देते.

# दुधाला फॅट कमी लागण्याची कारणे जाणून घ्या

दुग्ध उत्पादन व्यवसायात दुधाला फॅट (स्निग्धांश), डिग्री (एसएनएफ) कमी लागल्यामुळे बरेच नुकसान होते, शासकीय नियमानुसार गाईच्या दुधास ३.५ व म्हशीच्या दुधास किमान ६ टक्के फॅट असणे आवश्यक आहे. यापेक्षा फॅटचे प्रमाण जास्त असल्यास वाढीव दर मिळतो, यापेक्षा कमी असल्यास दूध स्वीकारले जात नाही व असे दूध कमी दराने विकण्याशिवाय पर्याय नसतो.

आनुवंशिकता : दुधास फॅट कमी लागण्याचे महत्त्वाचे पायाभूत कारण दुभत्या जनावराची आनुवंशिकता असून, दूध उत्पादन क्षमता आणि फॅटचे प्रमाण हे गुणधर्म गुणसूत्राद्वारे नियमित केले जातात. जनावराच्या वंशानुसार त्याच्या दुधातील फॅटचे प्रमाण बदलते. ज्या जातीपासून जास्त दूध उत्पादन मिळते त्या दुधात फॅटचे प्रमाण कमी आढळते व कमी दूध उत्पादन देणाऱ्या जातीमध्ये फॅटचे प्रमाण जास्त असते. म्हैसवंशीय जनावरांत फॅट ६ टक्के पेक्षा जास्त व गायवंशीय जनावरांच्या दुधात ४ टक्के फॅट असते. उत्तम आनुवंशिकता असणाऱ्या जनावरापासून त्यास उत्तम आहार, योग्य व्यवस्थापन व निरोगीपणा राखल्यास त्याच्यापासून जास्त फॅटचे दूध मिळविणे उत्पादकास शक्य आहे. गुणसूत्र शास्त्रानुसार कोणत्याही अपत्यात त्याची आई व बापापासून ५० टक्के प्रमाणे गुण येतात.

दुभत्या जनावराचा आहार : आनुवंशिकता चांगली असूनही त्याच्या क्षमतेनुसार चांगले दूध आणि फॅट मिळविण्यासाठी त्यांना समतोल आहार देणे गरजेचे आहे. बरेच पशुपालक आपल्याकडे उपलब्ध असलेला जो चारा असेल तो जनावरास खाऊ घालतात; परंतु दैनंदिन आहारात फक्त हिरवा चारा दिल्यास जनावरापासून दूध जास्त निघते परंतु फॅटचे प्रमाण कमी मिळते म्हणून पावसाळ्यात दुधाळ जनावरांना बहुतांशी ओला चारा जास्त मिळत असल्यामुळे दुधातील फॅट कमी होते. त्यासाठी त्याच्या दैनंदिन आहारात वाळलेला चारा कमीत कमी ३ ते ४ किलो देणे आवश्यक आहे. तसे पाहता चाऱ्याचे नियोजन करून जनावरांना वर्षभर हिरवा व सुका चारा खाऊ घालावा व सोबत ढेप, चुनी, सरकी, मका अशा प्रकारची प्रथिने व मेदयुक्त आहार द्यावा. दुधातील फॅटचे प्रमाण वाढविण्यासाठी ॲसिटिक आम्ल हा महत्त्वाचा घटक आहे आणि हे आम्ल तयार होण्यासाठी वाळलेल्या (सुक्या) चाऱ्यातील सेल्युलोज (तंतूमय पदार्थ महत्त्वाचे आहे. त्यासाठी गाई, म्हशींना दुधातील जनावरांना हिरव्या चाऱ्यासोबत सुका चारा देणे गरजेचे आहे.



दुधाळ जनावराच्या आहारात तेलबियांची पेंड उदा. सरकी ढेप, सरकी, शेंगदाणा पेंड, सोयाबीन पेंड, खाण्याचा सोडा, तेल, तूप आणि बायपास फॅट असणारे खाद्य दिल्यास त्यांच्या दुधातील फॅटचे प्रमाण तात्पुरते वाढते.

२) आंबाडीचा भरडा + तिळाचे तेल ५० मि.ली. + गूळ २५० ग्रॅम दिल्यास फॅटचे, डिग्रीचे प्रमाण तर वाढतेच; परंतु दूध देण्याचे प्रमाणही वाढते व दूध देण्याच्या तक्रारीही उदा. पान्हा चोरणे, वासरू दगावल्यावर दूध न देणे या तक्रारीही कमी होऊन जनावरे दुधावर येतात असा अनुभव शेकडो जनावरांवर प्रयोग केल्यानंतर आला आहे. ३) जनावराच्या आहारात अचानक बदल केल्याने दूध उत्पादनावर, फॅट व डिग्री कमी होण्यावर परिणाम होतो. म्हणून अचानक बदल टाळावेत. कुपोषण टाळावे. ४) दुधाळ जनावरांच्या आहारात उसाचे प्रमाण जास्त ठेवल्यास दुधातील फॅटचे प्रमाण कमी होते तसेच जनावराच्या आहारात प्रथिनांचे प्रमाण वाढल्यास दधातील फॅट कमी होते.

दूध काढण्याच्या चुकीच्या पद्धती : दुधाची धार काढण्यापूर्वी कास चांगली स्वच्छ घुसळून धुवावी, जेणेकरून कासेच्या वरील भागातील दुधातील फॅटचे कण घुसळले जातील व दुधात उतरले जातील. कारण दूधनिर्मिती कासेत सतत कार्यान्वित असते व फॅट हा घटक हलका असल्याने कासेच्या वरच्या भागातील दुधात जास्त प्रमाणात असतो. दूध काढताना सुरुवातीच्या धारांमध्ये सर्वसाधारणपणे एक टक्के इतके फॅट असते तर शेवटच्या धारांपर्यंत संपूर्ण दूध काढावे कारण अपूर्ण दूध काढल्यास दूध निर्मिती प्रक्रियेवर विपरीत परिणाम होऊन दुधातील घटकांचे प्रमाण कमी होते म्हणून दूध पूर्णपणे ६ ते ७ मिनिटाच्या कालावधीत काढणे गरजेचे आहे. पूर्ण दूध काढलेतर दुधातील फॅटवर परिणाम होत नाही. पूर्ण धार नाही काढली तर कासेत दूध राहते व फॅट कमी होते.

वासरु कासेला पाजणे : वासराला धारा काढल्यानंतर शेवटचे दूध पिण्यासाठी सोडू नये. शक्यतो वरच्या दुधावर वासरे वाढवावीत. शक्य असल्यास दूध काढणाऱ्या व्यक्तीमध्ये बदल करू नये. बदलामुळे दूध उत्पादनावर परिणाम होतो. सुरुवातीला पान्हा सोडण्यासाठी वासरू सोडणे ठीक आहे. कारण यावेळी दुधात फॅट कमी असते, तसेच शेवटचे दूध शिल्लक ठेवून वासरास सोडतात. म्हणून शेवटच्या दुधात जास्त फॅट असलेल्याचा फायदा मिळत नाही; तो फायदा वासरास मिळतो. ज्याची त्यास गरज नसते. परिणाम दुधात फॅट लागत नाही. म्हणून वासरास सुरुवातीस पाजावे ज्यामुळे पान्हाही सुटेल व वासरूही भुकेले राहणार नाही किंवा वासरास कासेला दूध न पाजता भांड्यातून पाजावे यामुळे फॅट, डिग्री वाढते असे अनेक फायदे होतात.




### महत्वाच्या घटना

१३०३ : अल्लाउद्दीन खिलजीने चित्तोडगड जिंकले.
१४९८ : मायकेल अँजेलो याने 'पिएटा' या जगप्रसिद्ध शिल्पकृतीच्या कामास सुरूवात केली.
१७६८ : कॅप्टन जेम्स कूक एच. एम. एस. एन्डेव्हर या जहाजातुन आपल्या पहिल्या सफरीवर निघाला.
१७९१ : जॉन फिच यांना स्टीमबोट साठी अमेरिकेचे पेटंट देण्यात आले.
१८८३ : डच इंडीज (सध्याचे इंडोनेशिया) बेटावरील क्राकाटाऊ ज्वालामुखीच्या उद्रेकात १३५ गावे भस्मसात होऊन सुमारे ३६,००० लोकांचा बळी गेला.
१९२० : अमेरिकेतील महिलांना १९६५ च्या कायद्या अंतर्गत मतदान करण्याचा अधिकार मिळाला.
१९४४ : दुसरे महायुद्ध चार्ल्स द गॉलने पॅरिसमधे प्रवेश केला.
१९७२ : पश्चिम जर्मनीतील म्युनिच येथे २० व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.
१९९४ : लोन टेनिसपटू रमेश कृष्णन आणि मध्यम पल्ल्याचा धावपटू बहादूर प्रसाद यांना के. के. बिर्ला फांउंडेशनचा पुरस्कार जाहीर
१९९६ : दक्षिण कोरियात १९७९ मध्ये झालेल्या लष्करी कटाबद्दल माजी अध्यक्ष चुन दू वान यांना मृत्यूदंडाची तर त्यांचे उत्तराधिकारी प्रो ताय वू यांना साडेबावीस वर्षे कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली.
२००२ : दक्षिण अफ्रिकेच्या जोहान्सबर्ग शहरांत दहा दिवसांच्या पृथ्वी शिखर परिषदेस प्रारंभ झाला.
२००८ : भारतीय तेलगु चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध अभिनेता चिरंजीवी यांनी आपला नवीन पक्ष प्रजा राज्यम पक्षाची स्थापना करून आंध्र प्रदेश राज्यातील तिरुपती या ठिकाणी पहिली सभा घेतली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७४० : हॉट एअर बलून चे शोधक जोसेफ-मायकेल मॉन्टगॉल्फ़र यांचा जन्म. (मृत्यू: ६ ऑक्टोबर १८१०)
१७४३ : ॲन्टॉइन लॅव्हाझिये फ्रेन्च रसायनशास्त्रज्ञ, आधुनिक रसायनशास्त्राचा जनक (मृत्यू: ८ मे १७९४)
१८९१ : भारतीय हिंदी साहित्याचे लेखक व कादंबरीकार आचार्य चतुरसेन शास्त्री यांचा जन्मदिन.
१९१० : मदर तेरेसा शांततेचा नोबल पुरस्कार तसचं, भारतीय सर्वोच्च नागीर पुरस्कार भारतरत्न सन्मानित अल्बेनियन-भारतीय रोमन कॅथोलिक धर्मगुरू व समाजसेविका (मृत्यू: ५ सप्टेंबर १९९७)
१९२२ : ग. प्र. प्रधान समाजवादी विचारवंत, स्वातंत्र्यसैनिक, शिक्षणतज्ज्ञ, राजकारणी, लेखक, महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती. 'स्वातंत्र्य संग्रामाचे महाभार', 'लोकमान्य टिळक', हाजी पीर', 'सोनार बांगला', 'भाकरी आणि स्वातंत्र्य' इ. मराठीतील पुस्तके प्रसिद्ध आहेत. (मृत्यू: २९ मे २०१०)
१९२७ : बी. व्ही. दोशी प्रख्यात वास्तुविशारद
१९२७ : भारतीय स्वातंत्र्य कार्यकर्ता, ज्येष्ठ काँग्रेस नेता, व हरियाणा राज्याचे माजी मुख्यमंत्री बंसीलाल यांचा जन्मदिन.
१९२८ : हिरो साइकिलचे सहसंस्थापक ओम प्रकाश मंजाल यांचा जन्म. (मृत्यू: १३ ऑगस्ट २०१५)
१९४४ : अनिल अवचट लेखक व सामाजिक कार्यकर्ते
१९५६ : प्रसिद्ध भारतीय राजकारणी व देशाच्या प्रथम पंतप्रधान महिला इंदिरा गांधी यांचे दिवंगत पुत्र संजय गांधी यांच्या पत्नी मेनका गांधी यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७२३ : अँथनी व्हॉन लीवेनहॉक डच सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ (जन्म: २४ आक्टोबर १६३२)
१९२७ : त्यांनी पॅरिस ते न्यूयॉर्क या ५,८०० किलोमीटरच्या विनाथांबा विमानोड्डाण स्पर्धेत भाग घेऊन साडे तेहतीस तासांत ती स्पर्धा जिंकली. वैमानिकी जीवनाच्या अनुभवांवरील त्यांच्या 'द स्पिरीट ऑफ सेंट लुईस' या पुस्तकास पुलित्झर पुरस्कार मिळाला. (जन्म: ४ फेब्रुवारी १९०२)
१९३४ : प्रसिद्ध भारतीय बंगाली संगीतकार, गीतकार आणि गायक, तसचं, महान कायदेपंडित, परोपकारी, समाजसेवक, शिक्षणतज्ञ आणि साहित्यिक अतुल प्रसाद सेन यांचे निधन.
१९४८ : कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर ख्यातनाम महाराष्ट्रीयन मराठी साहित्यकार, लेखक, नाट्याचार्य, पत्रकार आणि लोकमान्य बाळगंगाधर टिळक यांचे सहकारी व केसरी वृत्तपत्राचे संपादक व नवाकाळ वृत्तपत्राचे संस्थापक (जन्म: २५ नोव्हेंबर १८७२)
१९५५ : मुंबई मराठी साहित्य संघाचे संस्थापक अ. ना. भालेराव यांचे निधन.
१९५५ : मल्याळी चित्रपट अभिनेते बालन के. नायर यांचे निधन.
१९७४ : चार्ल्स ऑगस्टस लिंडबर्ग धाडसी अमेरिकन वैमानिक.
१९७५ : भारतीय स्वातंत्र्यसेनानी आणि काँग्रेस सेवा दलाचे संस्थापक व राजकारणी डॉ. नारायण सुब्बाराव हार्दिकर यांचे निधन.
१९९९ : नरेन्द्रनाथ डेव्हिस करंडक लॉन टेनिसपटू (जन्म:)
२०१२ : ए. के. हनगल पद्मभूषण पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय स्वातंत्र्यसेनानी, हिंदी चित्रपट व रंगमंच अभिनेते (जन्म: १ फेब्रुवारी १९१७)

# सीना प्रकल्पातून मेहकरी धरणात पाण्याला सुरुवात

## पंधरा दिवसात मेहकरी धरण भरून घेणार- आ.बाळासाहेब आजबे

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील मेहकरी धरण हे अद्याप पर्यंत कमी पावसामुळे भरलेले नाही पुणे परिसरात झालेल्या पावसामुळे सीना धरणामध्ये कुकडीचे पाणी सोडण्यात आले आहे सीना धरणात मुबलक पाणीसाठा उपलब्ध झाल्यामुळे सीना धरणातून आज शनिवार २४ ऑगस्ट रोजी आमदार बाळासाहेब आजबे यांच्या हस्ते बटन दाबून मेहकरी धरणात पाणी सोडण्यात आले येत्या पंधरा दिवसांमध्ये सीना धरणातून मेहकरी धरण भरून घेण्यात येणार आहे असे यावेळी आमदार बाळासाहेब आजबे यांनी सांगितले.

शनिवार दिनांक २४ ऑगस्ट रोजी सीना धरण येथे आमदार बाळासाहेब आजबे यांच्या हस्ते सीना धरणातून मेहकरी धरणात पाणी सोडण्यास बटन दाबून प्रारंभ करण्यात आला यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष काकासाहेब शिंदे युवा नेते महेश आजबे अर्जुन काकडे, घटनेतील सुभाष वाळके सरपंच केशव आजबे उपविभागीय अधिकारी श्री.रमेश आडे, श्री.घोडेश्वर साहेब, शाखाधिकारी



श्री.गावडे साहेब यांच्यासह मान्यवर मंडळी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी आणि शेतकरी बांधव उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदारआजबे म्हणाले की पुणे परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्यामुळे कुकडी धरण भरले आहेत त्यामुळे कुकडी धरणातून बोसाखिंड मार्गे सिना प्रकल्पामध्ये गेल्या पंधरा दिवसापासून पाणी सोडण्यात आले आहे त्यामुळे सीना धरणनात मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध झाल्यामुळे सीना धरणातून पुढील काळामध्ये मेहकरी धरणात पाणी सुरू राहणार आहे.

सलग पंप हाऊस सुरू राहिल्यास येत्या पंधरा दिवसाच्या आत धरण पूर्णपणे भरेल मेहकरी धरण पूर्णपणे भरल्यास या भागातील शेतकऱ्यांचा पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे सध्या आष्टी तालुक्यामध्ये ही चांगला प्रमाणात पाऊस सुरू आहे सर्व तलाव जवळपास भरले असून मेहकरी व इतर काही तलाव भरण्याचे बाकी आहेत सीना धरणातून व होणाऱ्या पावसाच्या पाण्यातून मेहकरी धरण लवकरच भरेल त्यामुळे पुढील काळात उद्भवणाऱ्या पाण्याच्या समस्या पासून या भागातील शेतकऱ्यांची सुटका होणार आहे मागील वर्ष वगळता दरवर्षी आपण मेहकरी धरण भरून घेतले आहे त्यामुळे आष्टी तालुक्यात पाण्याची टंचाई भासली नाही लवकरच शिंपोरा ते खुंटेफळ ही योजना ही पूर्ण होणार असून येणाऱ्या काळामध्ये दोन्ही योजनांच्या पाण्यामुळे आष्टी तालुका सुजलाम सुफलाम होण्यास मदत होणार आहे असेआमदार बाळासाहेब आजबे काका यांनी यावेळी बोलताना सांगितले या कार्यक्रमासाठी पुडी वाहिरा हातोळण घोंगडेवाडी पारोडी परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## झाडे लावणे आणि ती जगवणे हे राष्ट्रीय कर्तव्यच मानलं पाहिजे- डॉ.सोनवणे



आष्टी । प्रतिनिधी

सध्या तालुक्यात आणि शहरात झाडांची संख्या त्या तुलनेत कमी आहे. त्यामागे अनेक कारणे असल्याचे लक्षात येते.पण केवळ कारणे शोधून त्यामध्येच अडकून पडण्यापेक्षा वृक्षारोपणावर भर दिला पाहिजे.कारण झाडे जगली तरच आरोग्य,पर्यावरण संतुलित राहणार आहे.खरे तर झाडे लावणे आणि ती जगवणे हे राष्ट्रीय कर्तव्यचं मानलं पाहिजे.त्यादृष्टीने प्रत्येक नागरिकाचा मनापासून सहभाग आवश्यक असल्याचे प्रतिपादन डॉ.विलास सोनवणे यांनी केले.

आष्टी नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष डॉ.विलासराव सोनवणे यांच्या वाढदिवसाचे औचित्यसाधून बेलगांव ग्रामस्थ व आष्टी नागरी पतसंस्थेच्यावतीने रेणूकामाता मंदिर परिसरात वड,पिंपळ,गुलमोहर यासह अनेक १०१ वृक्षाचे वृक्षारोपण शनिवार दि.२३ रोजी सकाळी १० वा.करण्यात आले.तर बेलगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तसेच अंबिका विद्यालयातील १२० विद्यार्थ्यांना परीक्षा पॅड व पेन वाटप करण्यात आले असा समाज उपयोगी उपक्रम राबवत डॉ. विलासराव सोनवणे यांचा वाढदिवस सामाजिक बांधिलकी म्हणून साजरा करण्यात आला. व्यासपीठावर ॲड.निर्मला सोनवणे, पतसंस्थेचे उपाध्यक्ष नवनीत कटारिया,माजी शिक्षणाधिकारी विक्रम पोकळे,डॉ.प्रकाश झांजे,बेलगांव सरपंच तात्यासाहेब शिंदे, अंबिका विद्यालयाचे मुख्याध्यापक जेवे,आष्टी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रविण पोकळे, डॉ.नदिम शेख,माजी सरपंच बन्सीभाऊ पोकळे,युवा नेते अशोक पोकळे,उपसरपंच सतीश पोकळे,मसिताराम पोकळे,जेष्ठ पत्रकार भिमराव गुरव,पत्रकार सचिन रानडे, गणेश दळवी,ईश्वर पोकळे,माजी उपसरपंच संजय पोकळे,कैलास पोकळे, अमृत पोकळे, पतसंस्थेचे शाखाधिकारी काकासाहेब पोकळे,प्रशांत पोकळे,आनंद शेलार,काकडे आदि मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलतांना डॉ.सोनवणे म्हणाले, अन्न,वस्त्र,निवारा या मूलभूत गरजा प्रमाणेच ऑक्सिजनची देखील तेवढी गरज आहे. झाडांमुळे घर,बंगल्याचे सौंदर्य खुलते.एक प्रकारचा टवटवीतपणा जाणवतो. हीच बाब शहरासाठीही लागू आहे. ज्या शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर झाडे असतात तेथील नागरिकांच्या चेह-यावर तजेलदारपणा असतो.युरोपमधील अनेक शहरांत वृक्षारोपणावर विशेष लक्ष दिले जाते.त्याचे कारणच तेथील नागरिकांमधील जागरुकता हे असावे.भारतात अलीकडील काळात वृक्षारोपणाविषयी जागरुकता निर्माण झाली आहे.पण त्याचे प्रमाण अपेक्षे एवढे नाही. म्हणूनच जागतिक पर्यावरण दिनानिमित्त होणा-या मोहिमांचा अपेक्षित फायदा होत नाही.हे लक्षात घेऊन नागरिकांचा सहभाग वाढला पाहिजे तरच झाडे जगतील. बेलगाव ग्रामस्थांनी माझ्या वाढदिवसाचे औचित्य साधून वृक्षारोपण आणि कौतुक सन्मान केला तसेच १९८३ पासून या बेलगावाने मला खूप दिल आहे. माझ्या डॉक्टर म्हणून जनसेवेची सुरुवातच मी बेलगाव या गावातून केली आहे आणि या गावाने मला भरभरून दिलं आहे. अतिशय जिव्हाळ्याचे संबंध या गावाशी माझे सुरवातीच्या काळापासून राहिले आहेत.माझा वाढदिवस ग्रामस्थांनी साजरा केला असल्याने मनाला समाधान लाभले आहे असेही त्यांनी सांगितले. यावेळी संस्थेचे शाखाधिकारी काकासाहेब पोकळे यांची कन्या विद्यार्थी कु.अंकिता हिने आष्टी नागरी पतसंस्थेबद्दल माहिती आणि डॉ. सोनवणे यांच्या जीवन कार्याबद्दल अतिशय मुद्देसुदपणे प्रभावी मनोगत व्यक्त करत उपस्थितांचे मन जिंकले.या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन दिपक शिंदे यांनी केले तर आभार सिताराम पोकळे यांनी मानले.याप्रसंगी आष्टी नागरी पतसंस्थेचे कर्मचारी यांच्यासह विद्यार्थी, ग्रामस्थ आदि मान्यवर उपस्थित होते.

## दहीहंडी महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे- जाधव

माजलगाव । प्रतिनिधी



येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मागील दोन वर्षांपासून दहिहंडीचे आयोजन करण्यात येते, प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी दि.२७ ऑगस्ट मंगळवार रोजी दुपारी ४:०० वाजता शिवसेना माजी जिल्हाप्रमुख आप्पासाहेब कडाजीराव जाधव यांच्यावतीने आयोजित दहीहंडी महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आव्हान माजी जिल्हाप्रमुख आप्पासाहेब जाधव यांनी केले आहे.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक बाजार रोड माजलगाव येथे दिनांक २७ ऑगस्ट मंगळवार रोजी दुपारी ४:०० वाजता दहीहंडी महोत्सवाचे आयोजन केले आहे. हा दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. माजलगाव तालुक्यातील प्रत्येक नागरिकांसाठी हा उत्सव फारच आनंदाचा असतो, या उत्सवातील दहीहंडी महोत्सवात प्रथम पारितोषिक ५५ हजार ५५५/ रुपये ठेवले आहे. दहीहंडी महोत्सवात उपस्थित राहून चित्तथरारक दहीहंडी महोत्सवात आपला आनंद द्विगुणित करावा असे आव्हान आयोजक माजी जिल्हाप्रमुख आप्पासाहेब जाधव यांनी केले आहे.

## कायाकल्प फाऊंडेशनकडून घागरवाड्यात वृक्षारोपण

धारूर । प्रतिनिधी

घागरवाडा येथे भारतीय सेनेच्या १३६ इको बटालियनकडून ११५ हेक्टर वन क्षेत्रात होत असलेल्या वृक्ष लागवड व संवर्धन मोहिमेत कायाकल्प फाऊंडेशनच्या सदस्यांनी दि.२५ रविवार रोजी सहभाग नोंदवून डोंगरावर वृक्षारोपण केले. भारतीय सेनेच्या १३६ इको बटालियनच्या बी कंपनीकडून धारुर तालुक्यात वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धन मोहिम हाती घेण्यात आलेली आहे. भारतीय सेनेकडून धारुर वनपरिक्षेत्रातील घागरवाडा परिसरातील ११५ हेक्टर डोंगरी भागात सध्या वृक्षारोपण करण्यात येत आहे.

याशिवाय शहरातील महाविद्यालये, वस्तिगृह, ग्रामीण रुग्णालय आदी ठिकाणीही वृक्षारोपण करण्यात आलेले आहे. बीड जिल्ह्यात वन क्षेत्रात वाढ करण्याच्या उद्देशाने शासनाकडून ही मोहिम भारतीय सेनेच्या १३६ इको




बटालियनच्या माध्यमातून हाती घेण्यात आलेली आहे. या मोहिमेत सहभाग नोंदवून पर्यावरण रक्षण हितार्थ शहरात सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या पर्यावरणवादी कायाकल्प फाऊंडेशनच्या सदस्यांनी दि.२५ ऑगस्ट रविवार रोजी सहभाग घेतला. प्रत्यक्ष घागरवाडा येथील नियोजित साईटवर जावून वृक्षारोपण केले. यावेळी सुभेदार मोरे व बी कंपनीच्या सैनिकांनी सहकार्य केले. या वृक्षारोपणासाठी ज्येष्ठ वैद्यकीय व्यवसायिक व शेतीतज्ञ डॉ. बी.के. ठोंबरे, ज्येष्ठ पत्रकार अनिल महाजन, पत्रकार सय्यद शाकेर, प्राचार्य विजयकुमार शिनगारे, विश्वानंद तोष्णीवाल, दिपक गुळवे, अलंकार कामाजी, बालाजी सातभाई, संदिप शिनगारे, बिभीषण सोनार, प्रशांत सुपेकर, ज्ञानेश्वर शिंदे, सचिन चिद्रवार, राजन ठोंबरे यांनी सहभाग घेतला. भारतीय सेनेच्या शहरातील छावणीत इको बटालियनचे कंपनी कमांडर कर्नल अमित प्रभू, सुभेदार मोरे, हवालदार शेख जलील यांनी कायाकल्प सदस्यांचे स्वागत केले.

## गोमातेचे रक्षण करण्यासाठी युवकांनी पुढाकार घ्यावा :भंडारे

आष्टी । प्रतिनिधी

भारत हा कृषिप्रधान देश असून भारताची अर्थव्यवस्था ही पूर्णपणे शेतीवर अवलंबून आहे. शेतीचा दर्जा टिकविण्याचे काम ही गाय करते. शेतकरी जर बलवान व्हायचा असेल तर त्याला गाईच्या दुधाची आवश्यकता आहे. त्यामुळे भविष्यात देश वाचवायचा असेल तर गाईचे रक्षण करण्यासाठी युवकांनी पुढाकार घेण्याचे आवाहन ह.भ.प.संग्राम बापू भंडारे यांनी केले.ते कडा येथील महेश मंदिरामध्ये श्रावण मासानिमित्त सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहात बोलत होते.

पुढे बोलताना भंडारे म्हणाले की, गाय ही विश्वाची माता असून आई एवढीच गाईला किंमत द्या. छत्रपती शिवाजी महाराजांनी पेट्रोलचे भाव कमी करण्यासाठी लढा दिला नाही तर गाईचे रक्षण करण्यासाठी लढा देऊन आदिलशाही पिटाळून लावली. गाय वाचली तरच देश वाचेल. भारत हा कृषी प्रधान देश असून या कृषीवरच सर्व भारताची अर्थव्यवस्था अवलंबून आहे.शेतीचा दर्जा टिकविण्याचे काम ही गाय करत असते. कारण शेती कसण्यासाठी शेतकरी पाहिजे आणि शेतकऱ्याच्या अंगामध्ये ताकद असेल तरच तो शेती कसेल. शेतकरी बलवान हवा असेल तर त्याला गाईचे दूध पाजले जाते म्हणून आईच इतकीच किंमत गाईला द्या. गोमातेमुळे शेतीचे पुनर्भरण होते तिच्यापासून मिळणाऱ्या मलमूत्रापासून शेती ही सकस होते. कोणत्याही रासायनिक खताने जी शेतीमध्ये किमया होणार नाही ती गोमातेच्या मलमूत्रापासून होते. ही गोष्ट शेतकऱ्यांनी ध्यानात घ्यायला हवी. भगवान श्रीकृष्णानी सुद्धा त्याकाळी गायीचे महत्त्व लक्षात घेतले होते व गाईची मनापासून शेवटपर्यंत सेवा केली होती. शेतकऱ्यांनी आपल्या गाईचा शेवटचा श्वास ही आपल्या गोठ्यातच करायला पाहिजे. तिला कसाबच्या दारात देऊ नका. दोन पाच रुपयाच्या मोहपायी तिला कसायाकडे देऊन पातक घेऊ नका. आपल्याला आई बद्दल जेवढा अभिमान आहे तेवढाच गाई बद्दल अभिमान बाळगा. गाईमुळे धर्म टिकत असून धर्माचे पालन करण्यासाठी युवकांनी पुढाकार करण्याचे आवाहन त्यांनी केले. हिंदू धर्माच्या रक्षणासाठी युवकांनी कटिबद्ध राहायला शिकणे ही सध्या काळाची गरज आहे.आपण देशासाठी काम केले पाहिजे. मानवी जीवनामध्ये शब्दाला खूप महत्त्व असून आपले शब्द हे अमृता सारखे असायला हवेत. आपल्या पवित्र वाणीतून आपल्या मुखातून निघणाऱ्या शब्दांमुळे कुणी दुःखी नाही झाला पाहिजे .आपल्या या रसाळ वाणीतील शब्दाचा वापर हा जपून करण्याचे आवाहन त्यांनी केले.

### खासदार यांची सप्ताहाला भेट

कडा येथील महेश मंदिरामध्ये गेल्या पन्नास वर्षापासून श्रावण मासानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे या सप्ताह सोहळ्यास शुक्रवारी सायंकाळी बीड लोकसभेचे खासदार बजरंग सोनवणे यांनी भेट दिली. सप्ताह कार्यक्रमाला खासदार येण्याची ही पहिलीच वेळ होती. खासदार सोनवणे यांनी महेश मंदिरातील सभा मंडपासाठी भरीव निधी देऊन मंदिर विकासाच्या कामांमध्ये हातभार लावणार असल्याचा शब्द यावेळी ग्रामस्थांना दिला.

## श्रीमद् राघवेंद्र स्वामी यांचे विचार कार्य भक्तांनी जोपासावे - व्यास गुरूजी



अंबाजोगाई । प्रतिनिधी

श्रीमद् राघवेंद्र स्वामी महाराज यांचे विचार कार्य समाजाला दिशा देणारे असून हे कार्य भक्तांनी जोपासावे असे आवाहन जेष्ठ साहित्यिक गणपत व्यास यांनी केले. मला मिळालेला पुरस्कार माझ्या दृष्टीने मोलाचा आहे. कै.रा.ज.संदीकर यांनी धार्मिक विचारांना गतीमान केले. असे त्यांनी यावेळी सांगितले.

तीन दिवसीय आराधना मोहोत्सवात व्यास बोलत होते की, रा.ज.संदीकर स्मृती पुरस्कार व्यास गुरूजी यांना प्रदान करण्यात आला. तर वै.चामनाचार्य जोशी स्मृती पुरस्कार श्रीराम प्रभाकरराव रामदासी (बिटरगावकर) यांना प्रदान करण्यात आला. या प्रसंगी झालेल्या सत्काराला उत्तर देताना व्यास गुरूजी यांनी श्रीमद्? राघवेंद्र स्वामी महाराज यांच्या विचार कार्याची माहिती उपस्थितांनासमोर मांडली. तर श्रीराम रामदासी यांनी वामनाचार्य जोशी यांच्या विचार कार्यांची माहिती भक्तांसमोर मांडली. त्यांच्या विचारांमुळेच मला कार्याची प्रेरणा मिळाली. असे त्यांनी यावेळी सांगितले. गणपत व्यास गुरूजी, श्रीराम रामदासी यांचा मान्यवरांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. या प्रसंगी व्यास गुरूजी यांनी श्रीमद्? राघवेंद्र स्वामी महाराज यांच्या जीवन कार्यावर गीत सादर केले. सर्वश्री कृष्णराव भोकरे, चौथवे गुरूजी, प्रा.डॉ.अलका तडकलकर आदींनी आपले विचार व्यक्त केले. मिलींद कर्हाडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सुत्रसंचालन प्रा.अर्चना जोशी यांनी केले. तर सर्वश्री धोंडोपंत चिंचोलकर, अशोकराव जोशी, शेषाद्रीचार्य पिंपळे, श्रीपाद सुधाकर कुलकर्णी, मिलींद कर्हाडे, आदींनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. या तीन दिवसीय आराधना महोत्सवाची सांगता पालखी सोहळ्याने झाली. पालखी सोहळा हा तीन दिवसीय आराधना महोत्सवात आकर्षक ठरला.

## आष्टीच्या कृषी प्रदर्शनात दर तासाला लकी ड्रॉ

### बंपर बक्षीस आणि महिलांसाठी खेळ पैठणीचा कार्यक्रम

आष्टी। प्रतिनिधी

महाराष्ट्रातील लाखों शेतकऱ्यांसाठी खास पर्वणी म्हणून माजी आ.भीमराव धोंडे यांच्या संकल्पनेतून दि.२९ ऑगस्ट ते १ सप्टेंबर २०२४ या कालावधीत मराठवाड्यातील सर्वात मोठे आष्टीत डा.स्वामीनाथन राज्यस्तरीय दुसरे कृषी प्रदर्शन येथे होणार आहे.चार दिवस चालणाऱ्या कृषी प्रदर्शनामध्ये आलेल्या शेतकऱ्यांच्या नावांमधून दर तासाला मोफत भव्य लकी ड्रॉ बक्षीस तर शेवटच्या दिवशी भाग्यवान शेतकरी जोडीसाठी लकी ड्रॉ मधून बंपर बक्षीस मिळणार असुन लाडक्या बहिणींसाठी उद्धव के.पी.प्रस्तुत महाराष्ट्रभर गाजत असलेला महिला भगिनींचा आवडता कार्यक्रम '' खेळ पैठणीचा '' शुक्रवार दि. ३० ऑगस्ट २०२४ रोजी सायंकाळी होणार आहे.

यासाठी प्रथम बक्षीस आहे ११ हजार १०१ रूपयांची मानाची पैठणी याशिवाय इतर भरपुर बक्षिसे जिंकण्याची व विविध खेळ खेळण्याची संधी आहे. आष्टी येथील श्री छत्रपती शाहू-फुले-आंबेडकर कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.श्रीराम आरसुळ, सर्व प्राध्यापक, विद्यार्थी व वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी आयोजित चार दिवसीय भव्यदिव्य अशा कृषी प्रदर्शनाचे




उद्घाटन कृषी मंत्री ना.धनंजय मुंडे व लोकनेत्या आ.पंकजाताई मुंडे, आदर्श सरपंच पोपटराव पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. समारोप १ सप्टेंबर रोजी अ.भा. वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष ह.भ.प.प्रकाश महाराज बोधले आणि गहिनीनाथगडाचे मठाधिपती महंत विठ्ठल महाराज गहिनाथगडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.सांगली येथील व देशातील सर्वात उंच ४१ लाख रुपये किमंतीचा खिलार कोसा जातीचा सोन्या बैल प्रदर्शनाचे विशेष आकर्षण ठरणार आहे.गतवर्षी १ लाख २५ हजार शेतकऱ्यांनी कृषी प्रदर्शनाचा लाभ घेतला होता.कृषी प्रदर्शनाच्या निमित्ताने चार दिवस दररोज दुपारी १२ ते २ या वेळेत कृषी संबंधित तज्ञांचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन लाभणार आहे. कृषी प्रदर्शनासाठी आलेल्या शेतकऱ्यांच्या नावांमधून दर तासाला लकी ड्रॉ काढण्यात येईल व लकी शेतकऱ्यांला शेती उपयोगी भेट वस्तू देण्यात येईल. शेवटच्या दिवशी बंपर लकी ड्रॉ काढुन विजेत्याला बक्षीस दिले जाईल. शेतकऱ्यांच्या मनोरंजनासाठी रोज सायंकाळी शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक कार्यक्रमा अंतर्गत पारंपारीक लोकगीते, लोककला, नाटक, शास्त्रीय संगीत,शेतकरी गीते, लोकनृत्य यांचे सादरीकरण करण्यात येतील.गतवर्षी एकुण १०० स्टॉल होते यावर्षी १५० स्टॉल राहतील. गेल्या प्रदर्शनात ७ ते ८ कोटी रुपयांची उलाढाल झाली होती यावर्षी हा आकडा वाढणार आहे. हे प्रदर्शन मोफत आहे त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन माजी आ. भीमराव धोंडे यांनी केले आहे. प्रदर्शन यशस्वीपणे पार पाडण्यासाठी माजी आ.भीमराव धोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली युवा नेते अजयदादा धोंडे, अभयराजे धोंडे, कृषी महाविद्यालयाचे प्राध्यापक,विद्यार्थी, व्यवस्थापक बंडु पाचपुते, गणेश जठार आदि परिश्रम घेत आहेत.

# भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी प्रयत्नशील :- प्रा. अशोक लोमटे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहराचे ग्रामदैवत माता योगेश्वरी देवी नवनिर्वाचित विश्वस्त मंडळ हे मंदिर विकास तथा भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहणार असल्याचे देवल कमिटीचे विश्वस्त मंडळाचे सचिव प्रा अशोक लोमटे तथा उपाध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी पत्रकार परिषदेत नमूद केले.श्री योगेश्वरी देवीच्या मंदिरात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी देवल कमिटीचे सहसचिव भोसले, कोशाध्यक्ष पांडे यांच्यासह सर्व विश्वस्त मंडळाचे पदाधिकारी तस्थ सर्व सदस्य उपस्थित होते. या देवल कमिटीची आगामी काळातील योजना व मंडळ आल्या पासून केलेली कामे भाविकांना कळावी या उद्देशाने पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

या पत्रकार परिषदेत बोलताना प्रा अशोक लोमटे यांनी सांगितले की मा. धर्मादाय आयुक्त बीड यांनी शासनाचा सर्व नियम व अटींच्या



अधिन राहुन दिनांक ०१/०७/२०२४ रोजी श्री. योगेश्वरी देवल कमिटीच्या नविन विश्वस्त मंडळाची निवड केली. सर्व नवनिर्वाचीत विश्वस्त मंडळाच्या सदस्यांची दिनांक ०१/०७/२०२४ रोजी देवल कमिटीचे पदसिध्द अध्यक्ष तहसिलदार श्री. विलास तरंगे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. या बैठकीत अंबाजोगाई शहराचे आराध्य, ग्राम दैवत माता श्री योगेश्वरी देवल कमिटीच्या उपाध्यक्ष पदी अंबानगरीचे माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी तर सचिवपदी प्रा. अशोक लोमटे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. तर सहसचिव पदी संजय भोसले तसेच कोषाध्यक्ष पदी शिरीष पांडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आल्याचे कमिटीचे अध्यक्ष तथा तहसीलदार विलास तरंगे यांनी जाहीर केले. निवडी जाहीर केल्यानंतर तहसीलदार यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना ''मी आई श्री योगेश्वरी जगदंबेची शपथ घेतो की आम्ही श्री योगेश्वरी देवी मंदिर विश्वस्त न्यासाचा व देवी भक्तांच्या हितांचेच निर्णय घेऊ, सर्व आर्थिक व्यवहार पारदर्शी ठेवू, त्याचबरोबर मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही आग्रही व प्रयत्नशील राहू'' अशी शपथ दिली. झालेल्या बैठकीत नवनियुक्त विश्वस्त राजकिशोर मोदी, माजी आमदार पृथ्वीराज साठे, शिरीष पांडे, सतीश लोमटे, अशोक लोमटे, संजय भोसले, राजाभाऊ लोमटे, अमोल लोमटे, राजपाल भोसले, प्रविण दामा, अजित चव्हाण, रवी कदम, श्रीराम देशपांडे, हंसराज देशमुख, आणि श्रीमती संध्या मोहिते हे उपस्थित होते. पदसिद्ध अध्यक्ष तथा तहसीलदार विलास तरंगे यांनी सर्व नवनिर्वाचित विश्वस्त मंडळास त्यांच्या नियुक्ती बद्दल सर्वांचे अभिनंदन करत त्यांना देवल कमिटी बाबतच्या पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

त्यानंतर सर्व नवनिर्वाचित विश्वस्त मंडळाची पहिली बैठक होऊन त्या बैठकीत दिनांक १८/०७/२०२४ पासुन मातेच्या महाआरतीनंतर दुपारी १२:०० ते २:०० या वेळेत (अन्नछत्र) महाप्रसाद सुरू करण्याचा ऐतिहासीक असा पहिला ठराव घेण्यात आला.दुसऱ्या ठरावात मंदीराचे दैनंदिन उत्पन्न वाढविण्यासाठी सकाळी पैठणीसह देवीची प्रथम महापुजा करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामध्ये प्रथम महापुजेस येणाऱ्या दोन व्यक्तीस रू. १०००/- जमा करून प्रथम महापुजा करता येईल. यामध्ये पैठणी (आवश्यक) यामुळे मंदीराचे मासिक उत्पन्न रू. २५,०००/- वाढले. मंदीरात होणारे देवीचे अभिषेक हे देवल कमेटीस कळवुन व रितसर पावती घेवुनच करावे असा ठराव घेण्यात आला. या अगोदर होणाऱ्या अभिषेक किंवा पुजेची नोंद कुठेच होत नव्हती. या ठरावास पुजा करणाऱ्या ब्राम्हण वृंदांनी देखील मोठ्या मनाने मान्य केली. यामुळे देखील मंदीराच्या मासिक उत्पन्नात रू. १५,०००/ - ते २०,०००/- वाढ झाली. दररोज रू. ५०/- प्रति अभिषेक याप्रमाणे २५ ते ३० अभिषेक दैनंदिन होत असतात. आज मितीस देवस्थानास जवळपास नगदी रोख बँक खात्यात जमा शिल्लक, सोने-चांदीच्या दागीन्यांपासुन अंदाजे रू. १०.०० लाख उत्पन्न जमा आहे. योगेश्वरी देवल कमिटीचे सन २०१४ पासुन लेखापरिक्षण केलेले नाही. २०१४ मध्ये लेखापरिक्षण झाले आहे. सदरील लेखापरिक्षणामध्ये अनेक गंभीर दोष दाखवलेले आहेत. सदरील दोष दूर करण्याचा आम्ही प्रयत्न करून पुढील सर्व वर्षाचे लेखापरिक्षण लवकरच पुर्ण करून घेण्यात येणार आहे. सदरील लेखापरिक्षण दुरूस्ती करण्यासाठी आम्ही सर्व कर्मचारी यांनी सतत पाठपुरावा केला. सर्व रेकॉर्ड देण्यासाठी तगादा लावला असता, सर्व कर्मचारी एकदम राजीनामा देवुन घरी बसले आहेत. तसेच मागील सचिव, कोषाध्यक्ष यांनी आजपर्यंत कोणतेही रेकॉर्ड, चाव्याची माहिती दिलेली नाही. त्यांनी ती लवकर द्यावी म्हणजे ऑडीट लवकर पूर्ण करून घेण्यात येईल. यासोबतच येणाऱ्या काळात मंदीर विकास कामाचा पुढील ३० वर्षासाठीचा रू. १०० कोटीचा मास्टर प्लॅन आराखडा तयार करण्याचे काम वास्तु विशारद आकाश कऱ्हाड यांच्या सल्यानुसार सुरू असून, त्यासाठी देवल विश्वस्त मंडळाच्या वतीने शासनस्तरावर पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे या पत्रकार परिषदेत देवल कमिटीच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने सांगण्यात आले.

# कांबळी नदीवरील पुलासाठी आजी-माजी लोकप्रतिनिधींना बांगड्यांचा आहेर

म्हसोबावाडी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील धानोरा ते मच्छिंद्रनाथ देवस्थान, वृद्धेश्वर रस्ता हा देवस्थान रस्ता आहे गेल्या पंचवीस वर्षापासून, प्रस्थापित राज्यकर्ते व शासन आजी-माजी आमदार यांनी, या दोन्ही गावातील पुलाचे बांधकाम करण्याचे काम करण्यासाठी अकार्यक्षमपणा दाखवत असल्यामुळे आजी-माजी आमदार लोकप्रतिनिधींना साडी चोळी व बांगडांची भेट ,जलमार्गाने देऊन गांधीगिरी पद्धतीने समाजसेवक परमेश्वर घोडके यांनी हे आंदोलन केले आहे. गेल्या दोन दिवसापासून कांबळी नदीच्या पुलावरून पाणी वात असून, जनजीवन विस्कळीत झाले आहे. सर्व दळणवळण भोजेवाडी , म्हसोबाचीवाडी , उंदरखेल, गहूखेळ, सावरगाव, शेडाळा, गंगादेवी, या गावांचे दळणवळण बंद झाले आहे. मुलांना शाळेत, कॉलेजला जाता येत नाही तर कोणी आजारी पडले तर त्यांना दवाखान्यात जाता येणार नाही व मोठ्या प्रमाणात पाणीच पाणी झाल्याने शेतीचे काम यामुळे बंद पडले आहेत. हा वृद्धेश्वर व मच्छिंद्रनाथ देवस्थान यांना जोडणारा देवस्थान रस्ता असून या पुलावरील पाण्यामुळे भाविकांचे खूप मोठे हाल होत आहेत. शासनाचे आणि लोकप्रतिनिधींचे लक्ष वेधुन घेण्यासाठी हे गांधी आंदोलन केले आहे. आष्टी पाटोदा शिरूर विधानसभेच्या निवडणुकीसाठी मी उमेदवार म्हणून मतांचा जोगवा मागत फिरणाऱ्या भावी आमदारांना, व मत घेऊन, निवडून येऊन सत्ता भोगणाऱ्या आजी माजी आमदार यांना हे दिसत नाही का ? आष्टी मतदारसंघातील आजी-माजी विकासपुरुष गेले कुठे असा सवाल यावेळी उपस्थित होत आहे. म्हणून यांना साडी चोळी व बांगड्याची भेट दिली आहे.या आंदोलन समाजसेवक परमेश्वर घोडके, शंकर घोडके,धुळाजी लकडे,अर्जुन घोडके, सरफराज पठाण, राजू शेख यासह पंचक्रोशीतील ग्रामस्थ सहभागी झाले होते.



तालुक्यात शुक्रवारी रात्री जोरदार पावसाने हिवरा येथील कांबळी नदीला पूर आला तर हिवरा-दादेगाव रस्त्यावरील पूल पाण्याखाली गेला तसेच धानोरा-हिवरा व सुलेमान देवळा-म्हसोबावाडी पूल पाण्याखाली गेल्याने रात्री १२ वाजेपासून वाहतूक ठप्प, अनेक गावांचा संपर्क तुटला, जनजीवन विस्कळीत. खरिपाची पिके पाण्यात गेली आहेत.

# खंडेश्वरी मंदिर परिसरातील विकास कामांना पैसा कमी पडू देणार नाही- माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

खंडेश्वरी देवस्थान हे बीडचे ग्रामदैवत आहे. माहूर नंतर या देवस्थानला अनन्यसाधारण महत्त्व आहे. हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या या देवस्थानच्या विकासासाठी आपण नेटाने प्रयत्न करून निधी उपलब्ध करून घेतला आहे. या देवस्थान प्रमाणेच शहरातील आणि मतदारसंघातील अन्य देवस्थानच्या विकासासाठी देखील आपण पुढाकार घेणार असल्याचे अभिवचन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी दिले आहे.

बीड शहराचे ग्रामदैवत असलेल्या श्री खंडेश्वरी देवी मंदिराच्या विकास कामासाठी प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी चार कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणला. या विकास कामाचे उद्घाटन गोरक्षनाथ टेकडीचे महंत ह.भ.प.शांतीब्रम्ह नवनाथ बाबा यांच्या प्रमुख उपस्थितीत माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते भूमिपूजन करून करण्यात आले.



यावेळी रोहित क्षीरसागर, बाबुशेठ लोढा, जगदीश काळे, विलास बडगे, दिनकर कदम, अरुण डाके, गणपत डोईफोडे, भास्कर जाधव, अशोक शेटे, विलास विधाते, रामेश्वरआप्पा कानडे, अमृत सारडा यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, सुदैवाने उशिरा का होईना पण यंदा पाऊस बर्यापैकी झाला आहे. शेतकरी राजा सुखी व्हावा आणि माझ्या जिल्ह्यातील जनतेला सुखाचे दिवस यावेत अशी खंडेश्वरी चरणी मी प्रार्थना करतो. माहूर गडाच्या देवीचे जसे महत्त्व आहे तसेच महत्त्व आता बीड मधील खंडेश्वरी देवीचे झाले आहे. रणजीत सिंह चौव्हाण यांची इच्छा आज पूर्ण होत आहे. त्यांचा मुलगा राणा चौव्हाण हा तरुण येथे सेवा करतो आहे. रणजीत यांच्या निधनानंतर मी स्वतः देवस्थानला भेट दिली तेव्हा प्रस्तावित कामांची माहिती घेतली आणि यासाठी नेटाने प्रयत्न सुरू केले. सुदैवाने या प्रयत्नाला यशही आले

# बुधवारी आष्टीत रंगणार महा दहीहंडी उत्सव

**या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहा युवा नेते – जयदत्त धस**




आष्टी । प्रतिनिधी

येत्या बुधवार दिनांक २८ ऑगस्ट रोजी आष्टी शहरात होणाऱ्या भव्य दहीहंडी महोत्सवास आष्टीसह तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन युवा नेते जयदत्त धस यांनी केले आहे.

आष्टी शहरातील पंचायत समिती प्रांगणात बुधवार दिनांक २८ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७ वाजता जयदत्त धस युवा मंचच्या वतीने भव्य दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले असून या महोत्सवासाठी माजी मंत्री सुरेश धस यांच्यासह मराठी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री लावण्य तारका मानसी नाईक, सिने अभिनेत्रीसई मांजरेकर, झेबा शेख यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. तर या महोत्सवामध्ये डीजेच्या तालावर तरुणाई फिरकणारा असून निशा कुसेकर ही प्रसिद्ध सूत्रसंचालिका या महोत्सवाचे सूत्रसंचलन करणार आहे. तर या दहीहंडी उत्सवाचे इव्हेंट बीड येथील सुप्रसिद्ध ड्रीमलँड चे रविराज जेधे हे करणार आहेत .दहीहंडी महोत्सवाची जय्यत तयारी सुरू असून आष्टी शहरात होणाऱ्या या दहीहंडी महोत्सवास आष्टी तसेच तालुक्यातील नागरिकांनी उपस्थित राहून आपला सहभाग नोंदवण्याचे आवाहन युवा नेते जयदत्त धस यांनी केले आहे.

# शासनाच्या योजना पोहचविण्यात आशा सेविका, मदतनीस यांचे मोलाचे योगदान

**डॉ.योगेश क्षीरसागर यांचे प्रतिपादन; बीडमध्ये सन्मान रणरागिनींचा सोहळ्यास प्रचंड गर्दी**

बीड । प्रतिनिधी

आरोग्य, महिला बालविकास, ग्रामविकास अशा अनेक विभागांच्या योजनांची तंतोतंत अंमलबजावणी आणि ग्रामीण भागात तळागाळापर्यंत नागरिकांपर्यंत लाभ पोहोचविण्याचं काम आशा सेविका, मदतनीस व पर्यवेक्षिका यांच्या माध्यमातून होत आहे. शासन आणि नागरिक यांच्यातील दुवा म्हणून त्यांचं मोलाचं योगदान आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले.

बीड येथील कल्पतरू प्रतिष्ठानच्या पुढाकारातून रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर शहरातील सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात रविवारी (दि.२५) अंगणवाडी सेविका, मदतनीस, पर्यवेक्षिका यांचा सन्मान सोहळा पार पडला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.सारिकाताई क्षीरसागर ह्या होत्या. व्यासपीठावर महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष शाकेरा शेख, राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवती आघाडी जिल्हाध्यक्ष प्रिया डोईफोडे, महिला आघडीच्या जिल्हा उपाध्यक्ष शालिनी परदेशी, बीड तालुकाध्यक्ष संगीता वाघमारे, कल्पना बांगर, ललिता अडाणी, माया वाघमारे, बांगर कोल्हे, सुनंदा कोल्हे यांच्यासह ◀◀ पान ३ वर

# नवनाथ शिंदे यांनी केज मतदार संघात तयार केले सकारात्मक वातावरण



**इंजि नवनाथ (एन डी) शिंदे यांनी जवळ जवळ अर्धा मस्तदर संघ काढला पिंजून**

अंबाजोगाई । प्रतिनिधी

केज मतदार संघासाठीची विधानसभा लढवू इच्छिणारे इंजि नवनाथ शिंदे (एन डी) यांनी केज मतदार संघ जवळपास अर्धा मतदार संघ पिंजून काढून त्यांच्यासाठी सकारात्मक वातावरण निर्माण केले आहे. जिल्ह्यातील अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या केज मतदारसंघाचे संभाव्य उमेदवार इंजि एन डी शिंदे यांनी केज मतदारसंघात असलेल्या अंबाजोगाई व केज तालुक्यातील विविध गावांना प्रत्यक्ष भेटी देऊन तेथील सरपंच, ग्रामपंचायत सदस्य तथा तेथील प्रतिष्ठित नागरिक त्यासोबतच तेथील युवक तथा महिला ग्रामस्थांच्या समोरासमोर प्रत्यक्ष भेटी घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. आपल्या संभाव्य उमेदवारीची माहिती देत आपल्या उमेदवारीचे पत्रक ◀◀ पान ३ वर

# कृषी महोत्सवात 'शिवभोजन'च्या माध्यमातून शेतकऱ्यांची उदरपूर्ती

बीड । प्रतिनिधी

परळी येथे सुरू असलेल्या राज्यस्तरीय कृषी महोत्सवात शेतकऱ्यांकडून प्रदर्शनाची पाहणी झाल्यानंतर भूक लागल्यावर हे सर्व शेतकरी शिवभोजन या दालनाकडे वळताना दिसतात.

राज्यस्तरीय या कृषी महोत्सवात शेतकऱ्यांची उदरपूर्ती करण्याची जबाबदारी शिवभोजन या दालनाने स्वीकारली आहे. केवळ दहा रुपयांमध्ये या ठिकाणी वरण भात भाजी पोळी असा चौरस जेवण केवळ दहा रुपयात उपलब्ध करून दिले आहे.




यासह या ठिकाणी विविध बचत गटांचे एकूण २४ खाद्य, दालने आहेत. जिथे वडापाव, थालीपीठ, झुणका भाकर पाणीपुरी यासह अन्य खाद्यपदार्थ माफक दरावर विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

शेतकऱ्यांची तसेच भेट देणाऱ्या नागरिकांची आणि इथे असलेल्या ◀◀ पान ३ वर

# 'हेलीग्रिझम' ईश्वरी फुलांची शेती करून शेतकरी झाला लखपती

बीड । प्रतिनिधी

राज्यस्तरीय कृषी महोत्सवात ईश्वरी फुल म्हणून ओळखले जाणारे वैज्ञानिक नाव ''हेलीग्रिझम' असणारे फुलांची माहिती जाणून घेण्यात बरेच शेतकरी उत्साही दिसले.

हेलिक्रिझम या फुलांना तडतडी फुल न सुकणारे फुल अथवा ईश्वरी फुल म्हणून ओळखले जाते. बीड जिल्ह्यातील पांगरी या गावात राहणारे प्रयोगशील शेतकरी ईश्वर शिवाजी शिंदे हे या फुलांची शेती करतात. हेलीग्रिझम हे फुल प्लास्टिक सारखे दिसते. आणि वर्षभर या फुलांना काहीच होत नाही. या फुलांना पाण्यात बुडवल्यावर ते चिमतात आणि उन्हात ठेवल्यावर पुन्हा फुलतात हे या फुलाचे विशेषत्व आहे.

श्री शिंदे यांनी यांत्रिकी अभियंताची पदवी घेतली आहे. मात्र, त्यांना शेतीमध्ये विविध प्रयोग करायला आवडत असल्यामुळे ते प्रयोगशील शेतकरी म्हणून महाराष्ट्रभर परिचित आहेत. ईश्वरी फुल पर्यावरण पूरक असून वर्षभर फुल सुकत नाही. प्लास्टिकच्या फुलांना पर्याय म्हणून या फुलांची मोठ्या प्रमाणात मागणी होत असल्याचे श्री शिंदे यांनी बोलताना सांगितले.

# सरस्वती गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी कुलदीप किशोर परदेशी तर सचिवपदी निलेश मुथा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील सांस्कृतिक परंपरा जोपासणाऱ्या गुरुवार पेठ येथील सरस्वती गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी कुलदीप किशोर परदेशी यांची तर सचिवपदी निलेश मुथा यांची निवड करण्यात आली.

सरस्वती गणेश मंडळ गणपतीस अंबाजोगाईत मानाचे स्थान आहे. गणेशोत्सवाची मोठी परंपरा असलेल्या या मंडळाने प्रतिवर्षी आकर्षक धार्मिक आणि सामाजिक देखाव्यांद्वारे अंबाजोगाईकरांची मने जिंकली आहेत. मंडळाचे सांस्कृतिक सोबतच सामाजिक कार्यातही योगदान राहिले आहे. रक्तदान शिबिरे, वृक्षारोपण, सामाजिक प्रश्नांवर समाजप्रबोधन आदी उपक्रम राबविले आहेत.



आगामी गणेशोत्सव लक्षात घेता गुरुवार (दि.२२) रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत सरस्वती गणेश मंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत सर्वानुमते मंडळाची नवी कार्यकारीणी जाहीर करण्यात आली. त्यानुसार अध्यक्षपदी कुलदीप परदेशी, उपाध्यक्षपदी जावेदभाई, संजय अपूर्वा, सचिवपदी निलेश मुथा, कार्याध्यक्षपदी अक्षय परदेशी, कोषाध्यक्षपदी योगेश परदेशी, सामाजिक ◀◀ पान ३ वर

# प्रसिद्ध विधिज्ञ ॲड अनिल सुतार यांच्या पार्थिवावर साश्रुनयनांनी रायमोह येथे अंत्यविधी

रायमोह । प्रतिनिधी

बीड न्यायालयातील प्रसिद्ध विधिज्ञ ॲड अनिल सुतार यांचे दिर्घ आजाराने निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर रायमोह येथे साश्रुनयनांनी अंत्यसंस्कार करण्यात आले.

रायमोह येथिल मुळ रहिवासी व बीड जिल्ह्यातील प्रसिद्ध विधिज्ञ ॲड अनिल सुतार हे कर्करोगाने एक वर्षापासून त्रस्त होते.त्यांच्यावर पुणे येथिल खाजगी रुग्णालयात उपचार सुरू होते.अनिल सुतार यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन वकिली व्यवसाय सुरू करुन आपल्या मधाळ वाणी व परोपकारी वृत्ती मुळे स्वहिम्मतीवर



स्वतः चे अस्तित्व निर्माण केले होते.आपल्या कष्टावर त्यांनी आपल्या दोन्ही मुलांना वैद्यकीय शिक्षण दिले आहे .त्यांनी आपल्या नातेवाईकांना व मित्रपरिवाराला मदतीचा हात दिला आहे.उसतोडणी मजुर,अबाला पिडीता तसेच गोरगरिबांचे वकील म्हणुन ॲड अनिल सुतार यांची ओळख होती.त्यांचा मित्रपरिवार मोठा होता.कर्करोगाने त्रस्त असताना त्यांची प्राणज्योत मालवली.त्यांच्या पार्थिवावर साश्रुनयनांनी रायमोह येथे अंत्यविधी करण्यात आले.याप्रसंगी बीड जिल्ह्यातील सर्व वकिल संघाचे पदाधिकारी,सर्व पक्षीय पदाधिकारी, मान्यवर, व्यापारी, पत्रकार मित्रपरिवार आप्तेष्ट सगेसोयरे संततधार पावसातही बहुसंख्येने उपस्थित होते.त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा,एक विवाहीत मुलगी असा परिवार आहे.सुतार परिवाराच्या दुःखात दैनिक राज्य लोकतंत्र परिवार सहभागी आहे.

# गुत्तेदाराच्या निष्काळजीपणामुळे पुल वाहून गेला

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी - बीड राष्ट्रीय महामार्गावरील पांगरी येथील वाण नदीवरील तात्पुरत्या स्वरूपाचा पुल शनिवारी पहाटे आलेल्या पुरामुळे वाहून गेला यामुळे तब्बल राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक ४८ तास खोळंबली आहे. यामुळे यश कन्ट्रक्शन व कार्यकारी अभियंता सुमंत यांच्यावर कारवाई करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट)जेष्ट नेते फुलचंद कराड यांनी केली आहे.



यश कन्स्ट्रक्शनला काळ्या यादीत टाका –फुलचंद कराड

परळी - बीड राष्ट्रीय महामार्गावरील पांगरी येथील वाण नदीवरील तात्पुरत्या स्वरूपाचा केलेला पुल भरावासह शनिवारी पहाटे आलेल्या पुरामुळे वाहून गेला. पहिल्याच पावसात पुल वाहून जाणार यासाठीजेष्ट नेते फुलचंद कराड यांनी पावसाळा सुरू होण्याच्या अगोदरच निवेदन दिले होते की, पावसाळ्याच्या तोंडावर पुलाचे काम सुरू करु नका या नदीचे पात्र मोठे आहे, या नदीला पाणी जास्त येते. यासाठी लिंबुठा ग्रामपंचायतीचा सुचनेचा ठराव दिला होता, पण कंपनीने फुलचंद कराड व लिंबुटा ग्रामपंचायतीच्या ठरावाची दखल न घेता तात्पुरत्या पुलाला दोन -तीनच पाईप टाकून थातूरमातूर भराव टाकला. व पुल पाडून कामाला सुरुवात केली. पहिल्याच मोठ्या पावसात पुल भरावासह वाहून गेला.सुदैवाने पहाटे पुल वाहून गेल्याने कोणतीही मोठी दुर्घटना घडली नाही कारण परळी - बीड महामार्गावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक सुरू असते. यामुळे दुर्घटना टळली आहे. पुल वाहून जावून जवळपास ४८ तास होवून गेले तरी वाहतूक सुरळीत झाली नाही, गुत्तेदार पुन्हा पहिले पाडेपंचावन्न करत असून पुन्हा पाईप कमी टाकून थातूरमातूर भराव टाकत आहेत याची पाहणी रविवारी फुलचंद कराड यांनी केली. यावेळी श्री कराड यांनी मागणी केली आहे की, यश कन्ट्रक्शनला काळ्मा यादीत टाकून कार्यकारी अभियंता सुमंत यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी केली आहे. यावेळी सरपंच सुधाकर बनसोडे, माजी सरपंच सुदामराव मुंडे, शरद गित्ते, अंगद मुंडे, ग्रामपंचायत सदस्य, रवी कराड, इंद्रमोहन मुंडे, विश्वनाथ मुंडे,महादेव कराड,विठ्ठल मुंडे, जयराम मुंडे, बाळासाहेब कराड, बालाजी कराड, सिद्धार्थ बनसोडे, गणेश मुंडे यांच्या सह परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पोलीस अधिकाऱ्यावर कोयत्याने हल्ला !

## गृहखात्याचा भोंगळ कारभार; गुन्हेगारच प्रबळ झालेत-जयंत पाटील



**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरात पुन्हा कोयत्याने हल्ला करणाऱ्या गँगने तोंड वर काढले आहे . पुण्यात वाद सोडवण्यासाठी गेलेल्या एका पोलीस अधिकाऱ्यावर हल्ला करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. रामटेकडी परिसरात सुरू असलेलं भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या पोलीस अधिकाऱ्यावर कोयत्यानं हल्ला करण्यात आला. दरम्यान, जखमी पोलिसाला उपचारासाठी रुग्णालयात हलवण्यात आलं. गेल्या काही दिवसांमध्ये महिला अत्याचाराची प्रकरणे समोर येत असतानाच आता पोलिसांवरच हल्ला करण्यात आल्याची घटना घडली. याबाबत शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील यांनी प्रतिक्रिया देत सरकार आणि गृह खात्यावर टीका केली आहे.

जयंत पाटील म्हणाले, पोलिसांवर कोयत्याने हल्ला झालेल्या घटनेबाबत बोलताना जयंत पाटील म्हणाले, पुण्यातील प्रकार अत्यंत गंभीर आहे. कायदा आणि सुव्यवस्थेच्या धज्ज्या उडालेल्या आहेत. पोलिसांचा वचक राहिलेला नाही. गुन्हेगारांवर नियंत्रण आणण्यासाठी पोलिसांनी कडकपणे काम केलं पाहिजे. गृहखात्यामध्ये भोंगळपणा आलेला आहे. पोलिस अधिकाऱ्यांचा मॉरल लो झालेला आहे. त्यामुळे अधिकारी कारवाई करण्यासाठी धजावत नाहीत. आता गुन्हेगारच प्रबळ व्हायला लागले आहेत, याचा अनुभव आजच्या घटनेतून आला. सरकारने पोलिसांच्या पाठिशी उभारलं पाहिजे. पुढे बोलताना जयंत पाटील म्हणाले, पोलिसांवर हल्ले करण्याची हिंमत महाराष्ट्रातील गुन्हेगारांमध्ये आली आहे. अधिकाऱ्यांवर हल्ला आत्तापर्यंत कधी ऐकलेला नव्हता. कोयत्याने पोलिसांवर हल्ला करणं अतिशय धक्कादायक आहे. याचा निषेध करतो. महाराष्ट्र पोलीसांमागे सरकारने ठाम उभं राहायला पाहिजे.. महाराष्ट्र सरकारने भूमिका घेतली पाहिजे. सरकारचं राज्याच्या प्रशासनाकडे आणि पोलीस खात्याकडे लक्ष नाही. पुण्यातील पोलीस व्यवस्था किती दुबळी झाली आहे हे दिसून येत आहेत.

### सरकार फेल, राजीनामा मागून उपयोग नाही

आता दोन महिने राहिले आहेत दोन महिन्यांसाठी त्यांचा राजीनामा मागण्यात अर्थ नाही असं मला वाटत. मुख्यमंत्र्यांपासून सगळेच सरकार महाराष्ट्रात फेल गेलेला आहे. महिलांचं संरक्षण ते करू शकत नाहीत, आता पोलिसांचंही संरक्षण करू शकत नाहीत, अशी समस्या निर्माण झालीय. कोणाची कधी बदली होईल आणि सगळ्याच बदल्या आर्थिक व्यवहार करून होत असेलत तर किती नैतिकता राहिली नाही, असंही जयंत पाटील यांनी सांगितलं.

# हर्षवर्धन पाटील लवकरच मोठा निर्णय घेणार ?

## भाजपाला जबर धक्का बसण्याची शक्यता, सुप्रिया सुळेंच्या विधानाने चर्चेला उधाण!

**पुणे । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय घडामोडी वाढल्या आहेत. राजकीय नेते विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी तयारीला लागले आहेत. काही नेते तर सोईचा पक्ष पाहून आगामी काळात पक्षबदल करण्याच्या तयारीत आहेत. लोकसभा निवडणुकीत महायुतीला बसलेला धक्का लक्षात घेता अनेक आमदार अस्वस्थ असल्याचं म्हटलं जातं आहे. असे असतानाच आता भाजपाचे नेते हर्षवर्धन पाटील हे देखील अस्वस्थ असल्याचं म्हटलं जातं आहे. सुप्रिया सुळे यांनी केलेल्या सूचक विधानानंतर या चर्चेला आता बळ मिळाले आहे.



इंदापूर विधानसभा मतदारसंघातून भाजपाकडून उमेदवारी मिळण्याची शक्यता दिसत नसल्यामुळे हर्षवर्धन पाटील अस्वस्थ आहेत. त्यामुळे ते शरद पवार यांच्या संपर्कात आहेत, अशी चर्चा चालू आहे. याबाबत सुप्रिया सुळे यांनीदेखील सूचक विधान केले आहे. सुप्रिया सुळे म्हणाल्या, हर्षवर्धन पाटील हे राज्याचे मोठे नेते आहेत. ते लवकरच योग्य निर्णय घेतील. त्यांनी घेतलेला निर्णय हा राज्याच्या हिताचा असेल, असे सुप्रिया सुळे म्हणाल्या आहेत. सुळे यांच्या या सूचक विधानानंतर आता इंदापूर मतदारसंघासह संपूर्ण महाराष्ट्रात वेगवेगळ्या चर्चांना उधाण आले आहे.

हर्षवर्धन पाटील हे भाजपाच्या तिकिटावर इंदापूर मतदारसंघातून विधानसभा निवडणूक लढवण्यास उत्सुक आहेत. मात्र ज्या पक्षाचा आमदार त्याच पक्षाला जागा, असे सूत्र महायुतीने ठरवल्याचे म्हटले जात आहे. सध्या हा मतदारसंघ अजित पवार यांच्या राष्ट्रवादीच्या ताब्यात आहे. या जागेवर मंत्री दत्तात्रय भरणे हे आमदार आहेत. म्हणजेच यावेळच्या विधानसभा निवडणुकीत ही जागा अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे हर्षवर्धन पाटील लवकरच वेगळा मार्ग निवडण्याची शक्यता आहे, असे म्हटले जात आहे. हर्षवर्धन पाटील यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत जाण्याचा निर्णय घेतल्यास, तो भाजपासाठी मोठा धक्का असेल.

# खडकी भागात भीषण अपघात; एकाचा मृत्यू ८ गंभीर जखमी



**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील खडकी भागात भीषण अपघात झाल्याची माहिती समोर आली आहे. रविवारी सकाळी ९ वाजता हा अपघात घडला आहे. बस वरील नियंत्रण सुटल्याने बस चालकाकडून अपघात घडल्याची माहिती समोर आली.

खडकी येथे रविवारी सकाळी एसटी बसने चार चाकीला धडक दिली. या अपघातात एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तर ८ जण गंभीर जखमी आहेत. जखमींना जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे. या अपघातात कारचं आणि बसचं मोठं नुकसान झालं आहे. बसवरील नियंत्रण सुटल्याने बस चालकाकडून हा भीषण अपघात झाला आहे.

# काँग्रेसचा आमदार निवडून आणणारच – माजी महापौर कविचंद भाट

**पिंपरी । प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाची सत्ता आल्यावर पिंपरी चिंचवड शहरात विकास कमी व भ्रष्टाचार जास्त असे निदर्शनात येते. पुन्हा शहराचे गत वैभव प्राप्त करण्यासाठी काँग्रेस पक्ष सत्तेत येणे महत्त्वाचे आहे. सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी व प्रत्येक कार्यकर्त्यांनी तळागाळापर्यंत जाऊन काँग्रेसचा आमदार निवडून आणणारच हा संकल्प करावा, असे मत माजी महापौर कविचंद भाट यांनी व्यक्त केले.


पिंपरी चिंचवड शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने रविवारी (दि. २५) पक्ष कार्यालयात माजी महापौर कविचंद भाट व शहराध्यक्ष डॉ. कैलास कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत पदग्रहण समारंभ व नियुक्तीपत्र वाटप कार्यक्रम पार पडला. यावेळी ते बोलत होते.



यावेळी ज्येष्ठ नेत्या बिंदू तिवारी, राजाराम भोंडवे, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पर्यावरण विभाग सरचिटणीस अमर नाणेकर, प्रदेश काँग्रेस सामाजिक न्याय विभाग उपाध्यक्ष वाहब शेख, वरिष्ठ उपाध्यक्ष मयूर जयस्वाल, ॲड. अनिरुध्द कांबळे, चिंचवड ब्लॉक अध्यक्ष ज्ञानेश्वर मलशेट्टी, पर्यावरण विभाग अध्यक्ष अक्षय शहरकर, अल्पसंख्यांक विभागाचे शहाबुद्दीन शेख, सामाजिक न्याय विभाग अध्यक्ष ड. अशोक धायगुडे, डॉक्टर सेल अध्यक्षा डॉ. मनिषा गरुड, शहर उपाध्यक्ष स्मिता पवार-मुलाणी, रशिद अत्तार, महेश बिराजदार पाटील, भिमराव जाधव, शहर सरचिटणीस मुन्साफअली खान, वसंत वावरे, शहर सचिव ड. मोहन अडसूळ, युवक काँग्रेस प्रवक्ता विशाल कसबे, आदींसह शहर काँग्रेस मधील आजी-माजी सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

कविचंद भाट म्हणाले की, पिंपरी चिंचवड शहराची निर्मिती ही काँग्रेस पक्षाच्या विचारधारेतून झालेली असून अनेक मोठे प्रकल्प काँग्रेस पक्षाच्या कार्यकाळात तयार झाले आहेत, त्याचा उपयोग आज शहवासीयांना होत आहे. शहराध्यक्ष डॉ. कैलास कदम यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा देऊन काँग्रेस पक्षाचा विचार घेऊन नागरिकांची सेवा करावी अशी सूचना दिली. यावेळी ओबीसी विभाग शहर प्रमुख पदी सोमनाथ शेळके, अनुसूचित जाती विभाग शहर प्रमुख पदी हिरामण खवळे, अनुसूचित जाती विभाग शहर कार्याध्यक्ष हर्षल ओव्हाळ, दक्षिण भारतीय सेल शहर प्रमुख पदी जॉर्ज मॅथ्यु, इंटक शहर प्रमुख तुषार पाटील, शहर उपाध्यक्ष मेहबूब मलिक, चिंचवड विधानसभा ब्लॉक उपाध्यक्षा अरुणा वानखेडे, सामाजिक सलोखा अभियान पिंपरी चिंचवड समन्वयक म्हणून राजन नायर यांना नियुक्ती पत्र वाटप करण्यात आले.

# पवना नदीत उडी मारून आत्महत्येचा प्रयत्न; मृतदेह आढळला नाही



**पुणे । प्रतिनिधी**

काळेवाडी पुलावरून पवना नदीत उडी मारून एका व्यक्तीने आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना रविवारी (दि. २५) सकाळी उघडकीस आली.

याबाबत माहिती अशी की, रविवारी सकाळी काळेवाडी पुलावरून पवना नदीमध्ये एका व्यक्तीने उडी मारली असल्याची माहिती अग्निशमन विभागाला मिळाली. त्यानुसार आठ वाजता मुख्य केंद्रातून एक पथक घटनास्थळी दाखल झाले. या पथकाने दुपारी दोन वाजेपर्यंत नदीमध्ये व्यक्तीचा शोध घेतला. मात्र उडी मारलेल्या व्यक्तीचा मृतदेह सापडला नाही. त्यानंतर अग्निशमन विभागाचे पथक परतले.

# मास्टर्स टेबल टेनिस लीग स्पर्धेत स्काय रेंजर्सला विजेतेपद

**पुणे । प्रतिनिधी**

विदुर पेंढारकर यांनी केलेल्या दुहेरी कामगिरीच्या जोरावर स्काय रेंजर्स संघाने प्रौढांच्या पुणे मास्टर्स टेबल टेनिस लीग स्पर्धेत विजेतेपद पटकाविले. अंतिम सामन्यात त्यांनी स्पार्टन्स संघाला ३-१ असे पराभूत केले.



टॉस अकादमीने आयोजित केलेल्या या स्पर्धेस शारदा स्पोर्ट्स सेंटर येथे शारदा समूहाचे प्रायोजकत्व लाभले होते. अंतिम सामन्यातील पहिला लढतीत स्काय रेंजर्स संघाचे नचिकेत देशपांडे यांना उपेंद्र मुळ्ये यांच्याकडून १२-१०, १०-१२, ९-११ असा पराभव स्वीकारावा लागला. मात्र नंतरच्या दुहेरीत मनोज फडके व विदुर पेंढारकर यांनी स्पार्टन्स संघाच्या शेखर काळे व सुनीत लाल यांचा ११-९,१५-१३ असा पराभव करीत १-१ अशी बरोबरी साधली. पाठोपाठ अनुभवी खेळाडू संतोष वाकराडकर यांनी स्पार्टन्स संघाच्या अभिजीत मिठापल्ली यांना १३-११, ११-५ असे पराभूत केले आणि सामन्यात २-१ अशी आघाडी घेतली. दुहेरीच्या परतीच्या लढतीत पेंढारकर व हरीश साळवी यांनी सुनीत लाल व अविनाश जोशी यांच्यावर ११-७,७-११,११-४ अशी मात केली आणि संघास ३-१ असा विजय मिळवून दिला. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ टेबल टेनिस संघटक (झींपश) दीपेश अभ्यंकर, आशिष बोडस, स्मिता बोडस यांच्या हस्ते झाला.

# इंद्रायणी नदीमध्ये महिला पोलिस शिपायाची आत्महत्या



**आळंदी । प्रतिनिधी**

आळंदीमध्ये इंद्रायणी नदीत उडी मारून महिला पोलिसांनी आत्महत्या केली. ही घटना रविवारी (दि. २५) सायंकाळी सव्वा पाच वाजताच्या सुमारास घडली.अनुष्का सुहास केदार (वय २० वर्षे, रा. लक्ष्मीनारायण नगर, दिघी) असे आत्महत्या केलेल्या पोलीस महिलेचे नाव आहे.

आळंदीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भीमा नरके यांनी दिलेल्या माहितीनुसार, अनुष्का केदार या पुणे ग्रामीण पोलीस दलात कार्यरत होत्या त्या सध्या पुणे ग्रामीण मुख्यालय येथे नेमणुकीस होत्या. त्यांनी रविवारी सायंकाळी सव्वा पाच वाजताच्या सुमारास इंद्रायणी नदीच्या नवीन पुलाजवळ गरुड खांबावरून नदीत उडी मारली.

घटनेची माहिती मिळताच आळंदी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. अनुष्का केदार यांना नदीत शोधण्याचे काम सुरू आहे. मात्र मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे इंद्रायणी नदीला मोठ्या (-श्ररपवळ) प्रमाणात पाणी आले आहे. त्यामुळे शोधकार्यात अडचणी येत आहेत

# पुण्यात सर्वधर्म समभाव महामोर्चा!

## जहाल घोषणा दिल्याने थेट ३०० जणांवर गुन्हा

**पुणे । प्रतिनिधी**

सरला बेटाचे महंत रामगिरी महाराज यांनी नाशिकमधील सिन्नर तालुक्यातील पंचाळे येथे प्रवचन करताना वादग्रस्त वक्तव्य केले होते. त्याचे पडसाद राज्यभर उमटत आहे. त्या वक्तव्याच्या निषेधार्थ रविवारी पुणे शहरात सर्वधर्म समभाव मोर्चा काढण्यात आला. या मोर्च्यात घोषणा मात्र भडक दिल्या गेल्या. तसेच टिपू सुलतान समर्थनार्थ घोषणाबाजी केली गेली. समाजात अशांतता निर्माण करण्याच्या त्या घोषणा होत्या. त्यामुळे पुणे पोलिसांनी ३०० जणांवर गुन्हा दाखल केला आहे.



पुणे शहरातून सर्वधर्म समभाव मोर्चा काढला गेला. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या बाहेर घोषणाबाजी करण्यात आली. त्यात थेट सर तन से जुदा करणाऱ्या घोषणा होत्या. सार्वजनिक शांततेचा भंग करुन समाजामध्ये असुरक्षितता व भितीचे वातावरण निर्माण करण्याचा हा प्रकार होता. त्यामुळे पुण्यात ३०० जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान या मोर्च्यात सहभागी झालेल्या काही जणांची ओळख पटली आहे. त्यांची पोलिसांकडून आता चौकशी सुरु होणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रामगिरी महाराज यांनी केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याचा निषेध म्हणून पुण्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सर्वधर्म समभाव महामोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी काही ठराविक लोकांनी सर तन से जुदा तसेच टिपू सुलतान समर्थनार्थ घोषणाबाजी केली. या प्रकरणाची गंभीर दखल घेत पोलिसांनी बंडगार्डन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. त्या गुन्ह्यात बेकायदेशीर जमाव जमवून विनापरवानगी मोर्चा काढून, मोर्चामध्ये बेकायदेशीरपणे सामील होऊन, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६८ प्रमाणे नोटीसचे उल्लंघन केल्यामुळे २०० ते ३०० जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अल्पवयीन विद्यार्थिनीच्या लैंगिक छळ प्रकरणी शिक्षक, मुख्याध्यापकाला पोलीस कोठडी; इतर आरोपींची न्यायालयीन कोठडीत रवानगी

**पिंपरी । प्रतिनिधी**

सहा वर्षांपूर्वी शाळेतील एका मुलीशी अश्लील चाळे केल्याप्रकरणी पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल झालेल्या खेळाच्या शिक्षकाने अल्पवयीन विद्यार्थिनीचा दोन वर्ष लैंगिक छळ केल्याचा धक्कादायक प्रकार शुक्रवारी (दि. २३) निगडी मध्ये उघडकीस आला. याप्रकरणी पोलिसांनी नराधम शिक्षक, मुख्याध्यापकासह संस्थेच्या अध्यक्ष आणि इतर सदस्यांना अटक केली. आरोपी शिक्षक आणि मुख्याध्यापक यांना न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली असून इतर आरोपींची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली आहे.





निवृत्ती देवराम काळभोर (रा. चिंचवड), मुख्याध्यापक अशोक जाधव अशी पोलीस कोठडी झालेल्या आरोपींची नावे आहेत. तर लि सोफिया एज्युकेशन सोसायटी पुणे या ट्रस्टचे अध्यक्ष रोहिदास बलभिम जाधव, लक्ष्मण नामदेव हेंद्रे, अविंद्र अंकुश निकम, गोरख सोपान जाधव, हनुमंत दादा निकम आणि शुभांगी अशोक जाधव यांची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे.

निगडी मधील एका शाळेत पीडित मुलगी सातवीच्या वर्गात शिक्षण घेत आहे. आरोपी काळभोर हा शाळेत खेळाचा शिक्षक आहे. काळभोर हा पिडीत मुलीस वारंवार लैंगीक त्रास देत असे. पिडीत मुलीच्या वर्गातील विदयार्थ्यांना पिटीच्या क्लाससाठी ग्रांउडवर घेवून जात व येत असताना पिडीत मुलीशी अश्लील चाळे करीत असे. तसेच, हा प्रकार कोणाला सांगितला तर तुला लय मारीन अशी धमकी देत असे. २१ ऑगस्ट रोजी पिडीत मुलगी ही वॉशरूम वरून बाहेर येत असताना काळभोर याने पुन्हा तिच्याशी अश्लील वर्तन केले. अखेर मुलीने घरच्यांना हा प्रकार सांगितल्यानंतर त्यांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली.

आरोपी निवृत्ती काळभोर याच्याविरुध्द निगडी पोलीस ठाण्यात २०१८ मध्ये शाळेतीलच एका अल्पवयीन मुलीशी अश्लील चाळे केल्याप्रकरणी पॉक्सो कायद्या अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्हयामध्ये काळभोर हा न्यायालयातून जामिनावर बाहेर आला होता. तरीसुध्दा त्याला शाळा व्यवस्थापनाने पुन्हा शाळेत नोकरी दिली. काळभोर यांच्यासारखा विकृत वृत्तीचा व्यक्ती तुरुंगात होता हे माहित असताना देखील शाळा व्यवस्थापनाने त्याला पुन्हा शाळेत नोकरीवर घेतले. हे एका पध्दतीने लैंगीक अत्याचाराच्या गुन्हयांना प्रोत्साहन दिल्यासारखे असल्याचे फिर्यादीत नमूद आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी तत्काळ सर्व आरोपींना अटक केली. आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने शिक्षक आणि मुख्याध्यापक यांना पोलीस कोठडी सुनावली आहे. तर इतर आरोपींची न्यायालयीन कोठडीत रवानगी केली आहे.

# समाजात स्व-भान जागे व्हावे यासाठी ग्रंथाचा प्रकल्प हाती घेतला - डॉ. गणेश देवी

**पुणे । प्रतिनिधी**

समाजात बेभानता वाढत आहे. या पार्श्वभूमीवर, समाजात स्व-भान जागे व्हावे यासाठी ग्रंथाचा प्रकल्प हाती घेतला, असे प्रतिपादन ज्येष्ठ भाषाशास्त्रज्ञ आणि 'द इंडियन्स' ग्रंथाचे संपादक डॉ. गणेश देवी यांनी केले. विशिष्ट धर्म, पंथांविषयी कमालीचा विद्वेष वाढला आहे. त्यामुळे अस्वस्थ होऊन जगातील सर्व संस्कृतींच्या ऐतिहासिक पुनर्लेखनाचा संकल्प केला आहे, असेही ते म्हणाले.

मनोविकास प्रकाशनातर्फे प्रकाशित करण्यात आलेल्या द इंडियन्स या मूळ इंग्रजी ग्रंथाच्या मराठी अनुवादाच्या प्रकाशन समारंभात ते बोलत होते. डॉ. गणेश देवी, टोनी जोसेफ आणि रवी कोरीसेट्टर यांनी हा ग्रंथ संपादित केला आहे. ज्येष्ठ पत्रकार आणि विचारवंत कुमार केतकर यांच्या हस्ते भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिर येथील नवलमल फिरोदिया सभागृह येथे सदर ग्रंथाचे प्रकाशन संपन्न झाले. इतिहासतज्ज्ञ आणि लेखिका डॉ. श्रद्धा कुंभोजकर, अनुवादक शेखर साठे, प्रमोद मुजुमदार आणि मनोविकास प्रकाशनाचे आशिष पाटकर यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.



डॉ. देवी यांनी 'द इंडियन्स' या ग्रंथाच्या निर्मितीची प्रक्रिया आपल्या भाषणातून उलगडली. २०१७ मध्ये केंद्र सरकारने देल्या १२ हजार वर्षांच्या इतिहासाच्या पुनर्लेखनासाठी सांस्कृतिक विभागातर्फे एक समिती नेमली. मात्र या समितीत देशाच्या सर्व भागांना प्रतिनिधित्व नव्हते. एकही महिला सदस्याचा समितीत समावेश नव्हता. ही माहिती समजल्यावर, आपण स्वतः अभ्यासकांची मदत घेऊन तथ्य, वास्तव सांगणारा ग्रंथ लिहावा, संपादित करावा, असा निर्णय घेतला. इतिहासाचा विपर्यास करून, नागरिकांना भ्रमित करून सत्ता काबीज करण्याचे प्रकार जगात अनेक ठिकाणी घडल्याची उदाहरणे आहेत. त्यांचे संदर्भ घेत आम्ही आमची सामाजिक, नैतिक, राजकीय, शैक्षणिक आणि बौद्धिक जबाबदारी पूर्ण करण्याच्या हेतूने एकत्र येऊन, या ग्रंथाची निर्मिती केली आहे. या ग्रंथाच्या तमिळ, मल्याळम, गुजराती आणि हिंदी अनुवादाचे कामही सुरू आहे, अशी माहिती देवी यांनी दिली. प्रकाशकीय मनोगतात आशिष पाटकर यांनी ग्रंथाच्या प्रकाशनामागील (झींपश) भूमिका सांगितली. विज्ञाननिष्ठ ग्रंथांचे जाणीवपूर्वक प्रकाशन आणि पुरोगामी विचारांचे अनुसरण करत असताना तथ्यावर, वास्तवावक आधारित इतिहास मांडला जावा, या भूमिकेतून हा ग्रंथ प्रकाशित केला, असे ते म्हणाले. सुप्रिया चित्राव यांनी सूत्रसंचालन केले.